
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र. ११२२७३





IRBK-0112273

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

७६७५
३०१३१७
३५५०
१२२५३

# मोहन-मंदिरातील मुले

श्री. रा. ना. झोळ
प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, धुळे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. ...१२२५३ नों. दि ............
वि. ... ... क. ..................

मूल्य रु. १·२५

IRBK-0112273

व्हीनस प्रकाशन : पुणे

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९६८

चित्रकार : अनंत सालकर

प्रकाशक :

**सदाशिव कृष्ण पाध्ये**

व्हीनस प्रकाशन

*'तपश्चर्या'*

३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :

**रा. ना. सरनाईक**

सुलभ मुद्रणालय

२९१ शनिवार पेठ : पुणे २

शिक्षण व वनमंत्री
महाराष्ट्र
सचिवालय, मुंबई ३२
२१ मार्च १९६८

## पुरस्कार

*मोहन मंदिर पुस्तक वाचले. प्राचार्य झोळ हे निष्ठावंत आणि नामवंत शिक्षणतज्ज्ञ आहेत. त्यांच्या अनुभवसमृद्ध जीवनाचे ओझरते दर्शन या पुस्तकात होत आहे. सद्विचार आणि सद्गुण यांमुळेच मुलांचे जीवन समृद्ध होत असते हे दोन्ही स्पष्ट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तकात केला आहे.*

(सही) : म. ध. चौधरी

## अर्पण-पत्रिका

महाराष्ट्राच्या असंख्य शालामंदिरांतून ज्ञानार्जन करीत असलेल्या व सुसंस्कार घेत असलेल्या बालदेवांना ही पुस्तिका नम्र भावाने समर्पण —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रमांक ... दि ...
क्रमांक ... नोंद दि ... 30/3/69

# बालदेवांनो !

तुम्हांला आपली शाळा आवडते का ? तुमच्या शाळेचे नाव काय ? स्वतःस आवडणारे असे एखादे नाव आपल्या शाळेला द्यावे, असे तुम्हांला वाटते का ? माझ्या माहितीची एक शाळा आहे. त्या शाळेचे नाव काय आहे, आहे माहीत ? **मोहन-मंदिर** ! किती गोड नाव आहे, नाही ? या शाळेतील मुले म्हणजेच ' मोहन-मंदिरातील मुले ! ' त्यांच्याच काही गोष्टी आज मी तुम्हांला सांगणार आहे.

मोठ्या माणसांना मुले फार आवडतात. हसरी, आनंदी, खेळकर, निरोगी आणि गुणवान मुले पाहून कोणाला आनंद होणार नाही ! मुले म्हणजे देवाघरची फुले, असे कोणी म्हणतात; तर मुले म्हणजे जणू बाल-देवच असेही कोणी मानतात. भगवान येशू ख्रिस्त, बुद्ध, महंमद पैगंबर किंवा महात्मा गांधी विनोबाजी, पूज्य सानेगुरुजी इत्यादी थोर विभूतींनी मुलांचे फारच महत्त्व मानले आहे. त्यांनी त्यांचे सदैव कौतुक केले आहे, आणि त्यांच्यातील देव जागृत करण्याचा संदेश सर्व जगाला दिला आहे.

त्यांचा हा संदेश अंमलात आणणे हेच शिक्षणाचे पवित्र कार्य आहे. ते केवळ शाळेतच चालते असे नाही, किंवा फक्त शिक्षकांनीच करावयाचे असते असेही नाही; तर ते मुलांवर प्रेम करणाऱ्या सर्वांनीच, सदैव आणि सर्वत्र करावयाचे असते. मोठेपणी तुम्ही मुलांनी चांगले व्हावे, गुणी व्हावे, देवासारखे वागावे, म्हणूनच तुम्हांला लहानपणापासून शिक्षण द्यावयाचे असते. शाळेत असल्यापासूनच एकमेकांवर प्रेम करणे; सर्व मुले म्हणजे भाऊभाऊ, एकाच आईची लेकरे असे समजून वागणे; कोणी उच्च, कोणी हलका असे न मानणे; सफाई किंवा शारीरिक कष्टाची कामे कमी न लेखणे; ती कामे शाळेत सर्वांनी मिळून करणे; सर्व धर्मांतील थोर स्त्री-पुरुषांच्या चरित्रांपासून अनेक गुण संपादन करण्याचा पद्धतशीर प्रयत्न करणे; आपल्यापेक्षा दुबळे, अडचणीत असलेले इत्यादींना मदत करण्यास तयार असणे; शाळेचे स्वराज्य चालविण्याचे पद्धतशीर शिक्षण घेणे; त्यातून

लोकशाहीतील तत्त्वांची व नागरिकत्वाची शिकवण आचरणात आणणे इत्यादी प्रकारचे शिक्षण तुम्हा मुलांना आतापासून मिळाले पाहिजे. हेच खरे शिक्षण होय.

अशा प्रकारचे शिक्षण जीवन-शिक्षण-शाळांतून मिळत असते. तेथील मुले ते शिक्षण कसे घेतात? त्यांच्याशी त्यांचे गुरुजी कसे वागतात? मुलांकडून होणाऱ्या चुका लक्षात घेऊन त्यांना चांगले वळण लागावे म्हणून तेथील गुरुजी कसे प्रयत्न करतात, याबद्दलच्या काही गोष्टी तुम्हांला खासच आवडतील. त्या मुलांसारखे शिक्षण आपणासही मिळाले तर किती चांगले होईल! तसे गुरुजी आपणांस कधी मिळतील का?– असे तुम्हांला वाटेल! ते तसे मिळावेत म्हणून आपल्या सरकारचा प्रयत्न चालूच आहे. तो यशस्वी होईपर्यंत अशा शाळांतील मुलांच्या गोष्टी वाचण्यास तर तुम्हांला काहीच हरकत नाही! त्या वाचा, आणि त्यापासून काही गुण घेता आले तर जरूर घ्या. तसे ते तुम्ही घेतलेत आणि आपल्या आयुष्यात तुम्ही खरोखरीच मोठे होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलात, तरच मी या गोष्टी तुमच्यासाठी लिहिल्याचे सार्थक झाले, असे मला वाटेल.

१ ऑगस्ट १९६८ रा. ना. झोळ

# मंदिराच्या प्रांगणात

जीवन-शिक्षण-मंदिराच्या अभ्यासक्रमात लहान मुलांसाठी एक पुस्तिका तयार करणे हा एक भाग असतो, त्यास अनुसरून ही पुस्तिका तयार करण्याची संधी मिळाली. लहान मुलांसाठी काही तरी लिहावे, असे मला नेहमी वाटते. अगदी उत्कटत्वाने वाटते. वाटण्याला मूर्त स्वरूप देण्यास ही संधी चांगली आहे असे वाटले, आणि तिचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा असे मी योजले.

आनंदाची गोष्ट ही की, पुस्तिकेच्या लिखाणापूर्वीच आमच्या अध्यापन-शाळेतील मराठी ५ वी व ६ वी च्या मुलांना एकेक आठवडा प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव मिळाला. २०-२५ वर्षांनंतर प्रत्यक्ष बालसृष्टीत १५ दिवस काम करण्यास मिळाले. हा आनंदच बेहोष करून टाकणारा होता. त्यामुळे या कालखंडातील अनुभवाचे बारकाईने व अभ्यासपूर्वक निरीक्षण व टिपण करण्यात एक प्रकारचा खूपच हुरूप वाटत होता.

जीवन-शिक्षणाचे ध्येय नवसमाजनिर्मिती आहे. सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा, समता, मानवता इत्यादी चिरंतन मानवी मूल्यांवर आधारलेला असा हा समाज निर्माण करावयाचा आहे. परस्परांशी सहकार्याने वागणारा, प्रेमभाव दाखविणारा, स्वावलंबनाची धमक असणारा, आणि आपल्या जीवनात मानव्याचे दिव्य दर्शन देणारा समाज निर्माण व्हावा असे गांधीजींचे स्वप्न होते. या दृष्टीनेच लहानपणापासून मुलांवर संस्कार करणे हेच जीवन-शिक्षणाचे ध्येय आहे. अशा प्रकारचे संस्कार करण्यासाठी मुलांचे जीवन शिक्षकांच्या डोळ्यांपुढे सामग्र्यानेच राहील. या शिक्षणातील मूलोद्योग, समाजकेन्द्र, निसर्गकेन्द्र, सामुदायिक जीवन सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी गोष्टी म्हणजे साधने आहेत. या साधनांद्वारा इष्ट ते संस्कार मुलांवर करणे हेच खरे साध्य आहे. या साध्यांचा ध्रुवतारा सदैव डोळ्यांपुढे ठेवूनच शिक्षकाने काम केले पाहिजे. जीवन-शिक्षण-योजना राबविली पाहिजे.

जीवन-शिक्षणाची सारी मदार शिक्षकांवरच आहे. त्यांच्या हातून ज्या पद्धतीने ही योजना राबविली जाईल तीवर या योजनेचे यशापयश अवलंबून आहे. या दिशेने काम करणारे शिक्षक दिसले तरच या योजनेवरील इतरांची श्रद्धा वाढेल. म्हणूनच, असे आदर्श शिक्षक एका शाळेत आहेत अशी कल्पना करून या गोष्टी रचल्या आहेत. या गोष्टी काल्पनिक असल्या तरी त्यांना अनुभवाचाही पाया आहे हे नमूद करणे इष्ट वाटते. त्यांचा उपयोग सर्वच शिक्षकांना मार्गदर्शनपर होईल अशी अपेक्षा आहे. ती सफल होवो हीच इच्छा.

* * *

शिक्षण म्हणजे संस्कार या ध्येयाने महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणखात्याची सर्व सूत्रे हालविणारे, स्वतः संस्कारसंपन्न जीवन जगणारे माननीय **नामदार मधुकरराव तथा बाळासाहेब चौधरी**, शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी वेळात वेळ काढून सदर पुस्तिकेस पुरस्कार लिहून दिला याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

या पुस्तिकेस **डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खेर** यांची प्रस्तावना लाभली हेही माझे भाग्यच आहे. डॉ. खेर यांची विद्वत्ता, त्यांचे तत्त्वचिंतन, गाढा व्यासंग, सुसंस्कारसंपन्न असे त्यांचे स्वतःचे जीवन व शिक्षणक्षेत्रात त्यांनी केलेले कार्य आज महाराष्ट्रातच काय पण भारततही प्रसिद्ध आहे. डॉ. खेर व अनाथ विद्यार्थीगृह ही नावे अभिन्न आहेत. त्यांचे शिक्षण-क्षेत्रातील हे कार्य चिरंतन राहणारे असेच आहे.—शिक्षणक्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचा आशीर्वाद या पुस्तिकेस मिळाला याबद्दल मी स्वतःस धन्य समजतो व त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

बोर्डी येथे असताना मी वरील पुस्तिका १९५२ साली लिहिली होती. तिचे प्रकाशन व्हावे अशी उत्कट इच्छा होती. तिला आज मूर्त स्वरूप आले. माझे मित्र श्री. स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, यांनी जबाबदारी स्वीकारून ती पार पाडली याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

शिक्षणक्षेत्रात कार्य करणारी मंडळी तर या पुस्तिकेचे स्वागत करतीलच, पण अन्य क्षेत्रांत काम करणारे परंतु शिक्षणाबद्दल आस्था व जिव्हाळा असणारेही तिचे मनःपूर्वक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

बेसिक शिक्षण किंवा जीवनशिक्षण याबद्दल सर्वसामान्य जनतेपासून विद्वानांपर्यंत अनेक प्रकारचे गैरसमज आहेत. त्या सर्वांची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु बेसिक शिक्षणात चिरंतन स्वरूपाच्या, मूलभूत अशा कोणत्या गोष्टी आहेत व त्या साकार करण्यासाठी सदर योजना कोणत्या पद्धतीने हाताळावी हे सर्वांसमोर मांडण्याचा माझा प्रधान हेतू आहे.

गेली २० वर्षे या क्षेत्रात मी कार्य करीत आहे. याच दृष्टीने व जिद्दीने ही योजना मी हाताळीत आहे. आणि मी आत्मविश्वासपूर्वक सांगेन की, मला स्वतःला ही योजना हाताळताना आतापर्यंत खरोखर समाधानच लाभले आहे.

—रा. ना. झोळ

# मोहन-मंदिरातील मुले

# प्रस्तावना

माणसाच्या स्वभावाची जी जडण-घडण होते तिच्यात आईबापांचे जितके महत्त्व आहे, तितकेच प्राथमिक शिक्षकांचे आहे. मुलांमुलींची मने अगदी कोवळी आणि निरागस असतात. अशा वेळी त्यांचा प्राथमिक शाळेतील शिक्षक अथवा शिक्षिका यांच्याबरोबर संबंध येतो. शिक्षक त्यांना देवाप्रमाणे वाटतो. आईबापापेक्षा त्याचे महत्त्व जास्त वाटते. त्यामुळे पहिल्या चार-पाच इयत्तांमध्ये बालकांना जे संस्कार मिळतात ते त्यांना जन्मभर उपयोगी पडतात. माझा स्वतःचाही अनुभव असाच आहे. मराठी चवथी-पाचवीत मला जे शिक्षक होते त्यांनी मला जे बौद्धिक आणि नैतिक शिक्षण दिले ते मला जन्मभर उपयोगी पडत आहे.

चांगले शिक्षण कोणते असा प्रश्न विचारला तर त्याला पालक निराळी उत्तरे देतील आणि शिक्षणतज्ज्ञ निराळी उत्तरे देतील. या दोन वर्गांतील लोकांच्या दृष्टिकोणात अद्याप फार फरक आहे. या बाबतीत शहरातील व खेड्यातील पालक सारखेच आहेत. शिक्षण म्हणजे भाषा-गणित-तोंडी हिशेब-परीक्षा-मार्क-पास-नापास-प्रमाणपत्र या गोष्टी पालकांच्या डोळ्यांपुढे उभ्या राहतात. परंतु शिक्षकाच्या पुढे याहीपेक्षा व्यापक ध्येय असते. वरील सर्व गोष्टी साध्य करून त्याशिवाय शील-चारित्र्य-संस्कार-स्वभाव-सवयी नीति-शिक्षण-सत्प्रवृत्ती इत्यादी गोष्टीही साध्य झाल्या पाहिजेत. असा चांगल्या शिक्षकांचा दृष्टिकोण असतो. त्या दृष्टीने तो आपल्या शाळेतील सर्व कार्यक्रम आखतो.

ज्या गोष्टी मी रुक्ष आणि तात्त्विक भाषेत सांगितल्या त्याच निरनिराळ्या गोष्टींच्या स्वरूपात मनोरंजन होईल अशा रीतीने आणि अत्यंत सुबोध भाषेत प्रिन्सिपॉल झोळ यांनी मांडल्या आहेत. मोहन-मंदिरातील मुलांचा शिक्षक खेडेगावातील एका शाळेत काम करतो. पालकांनी आपल्या ताब्यात दिलेल्या चाळीस-पन्नास मुलां-मुलींवर प्रसंगा-प्रसंगाने शिक्षक

कोणत्या प्रकारचे संस्कार करू शकतो त्याचे प्रत्यक्ष चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढे प्रि. झोळ यांनी साकार केले आहे. या शाळेत अरविंद, मुकऱ्या, शिवा, लतिका, सुपड्या, उखड्या, शाम मोरे अशी हाडामांसाची, जिवंत मनाची बालके आहेत. त्यांच्या ठिकाणी चांगल्या प्रवृत्ती आहेत तशा वाईट सवयीही आहेत. शाळेच्या लहान जगामध्ये जे प्रसंग घडतात त्यांचा उपयोग करून त्या त्या वेळी शिक्षक मुलांची मने कशी घडवतो ते या छोट्या पुस्तकात वाचायला सापडते. ह्या बालकांच्या ठिकाणी प्रारंभी अव्यवस्थितपणा, गबाळेपणा, चोरीची सवय, द्वेष-मत्सर, इ० दुर्गुण असतात. परंतु त्यांची मने निरागस असतात. त्यांचे गुरुजी हळुवार हाताने आणि गोडीगुलाबीने या दुर्गुणांचा परिहार करून त्यांच्यावर सद्‌गुणांचे चांगले संस्कार कसे करतात त्याची प्रक्रिया या पुस्तकात वाचायला सापडते. कारखान्यात एखादी वस्तू तयार कशी होते, तिच्या निरनिराळ्या अवस्था जशा दिसतात, त्याप्रमाणे शिक्षक शाळेत मुलांची मने कशी घडवतो त्या क्रियेच्या निरनिराळ्या अवस्था या लहान पुस्तकात पाहावयास सापडतात.

शाळा ही निव्वळ पुस्तकातील किडे निर्माण करणारी जागा नसून जिवंत स्त्री-पुरुष नागरिक तयार करण्याची जागा आहे, हे या पुस्तकावरून लक्षात येते. शाळेला भेट देणारे भाऊसाहेब आणि शंकरराव यांनी शाळेला भेट दिली. आणि शिक्षण व शाळा याविषयीच्या त्यांच्या कल्पना बदलल्या. हे पुस्तक वाचून तसेच मतपरिवर्तन प्रत्येक वाचकाचे होईल. शाळा म्हणजे निव्वळ भाषा आणि गणित शिकवण्याची जागा नाही. त्या गोष्टी यायलाच पाहिजेत, पण चांगले संस्कार मिळाले नाहीत तर निव्वळ बौद्धिक शिक्षणाला काहीही किंमत नाही. बुद्धी आणि शील या दोन्ही गोष्टी शिक्षणात महत्त्वाच्या आहेत.

मुलांना हे पुस्तक गोष्टींमुळे मनोरंजक वाटेल. शिक्षकांना आणि पालकांना ते वाचून शिक्षणाविषयी नवी दृष्टी मिळेल.

**ग. श्री. खैर**
एम्. ए., पीएच्. डी.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. मोहन-मंदिर | ... ... | १ |
| २. समग्र कताई | ... ... | ४ |
| ३. अरविंदाची गोष्ट | ... ... | १० |
| ४. गुळाची चोरी | ... ... | १४ |
| ५. दोन भावंडे | ... ... | २० |
| ६. चिडवाचिडवी | ... ... | २६ |
| ७. मोहन-मंदिरास भेट | ... ... | ३० |
| ८. बाल-सेवक | ... ... | ३५ |
| ९. खरी परीक्षा | ... ... | ४० |

# १ : मोहन-मंदिर

हे पाहिलेत का आमचे मोहन-मंदिर ! काही लोक हिला जीवन-शिक्षण शाळा म्हणतात; पण आम्ही आमच्या या शाळेला ‘ मोहन मंदिर ’ असेच म्हणतो. पूज्य बापूजींचे नाव मोहनच होते ! त्यांची कायमची आठवण राहावी म्हणून हे नाव आम्हा सर्वांना फारच आवडते.

मोहन-मंदिराची इमारत तशी काही भव्य नाही. अगदी साधीच आहे ! विटांच्या भिंती ! वर साधी,— आमच्याच बाबूराव कुंभाराने मुद्दाम तयार केलेली कौले ! पण आत उजेड मात्र भरपूर ! हवाही खेळणारी ! दारे भक्कम ! भिवा सुताराने आपली सारी मेहनत व कारागिरी खर्ची खालून शाळेसाठी मुद्दाम तयार केलेली ! खिडक्याही भरपूर ! भक्कम गजांच्या ! आणि खालची जमीन आम्ही सर्व मुलांनी तयार केली आहे बरे ! पाहा ना ती कशी टणक व गुळगुळीत आहे ती ! कोठे तरी खड्डा पडलेला दिसतो आहे का तुम्हांला ? परवा कोणी पाहुणे आले होते मंदिरात ! त्यांच्याबरोबर दोन-तीन स्त्रियाही होत्या ! त्या तर फारच खूष झाल्या आमच्या शाळेची जमीन पाहून ! एक बाई म्हणाल्या, ‘ किती हो गुळगुळीत जमीन आहे या शाळेची ! तेल सांडले तरी खुशाल भरून घेता येईल की ! ’ त्यांचे हे उद्गार ऐकून आम्हां सर्वांनाच फार आनंद वाटला !

पण आमची ही शाळा पहिल्यापासूनच अशी नाही बरे का ? अहो, तिची पूर्वीची स्थिती काय विचारता ? काही वर्ग चावडीत, तर काही देवळात, तर काही भाड्याच्या इमारतीत ! आणि ती इमारत

तरी कसली ? अहो, दिवसाढवळ्या तेथे दिवा लावण्याची पाळी यायची ! आणि सगळे वर्ग विखुरलेले ते विखुरलेलेच ! अखेरीस गांधीजींच्या पहिल्या पुण्यस्मृतीच्या दिवशी घेतले सर्व गावातील मंडळींनी मनावर न् काय ? आणि मग तुम्हांला माहीत आहेच, ' गाव करील ते राव काय करणार ? ' गावच्या गावकींने ठरविल्यावर मग शाळेच्या इमारतीला काय अवकाश ? गावातील प्रत्येक कुटुंबाचा हात लागला आहे बरे या इमारतीला ! कोणी पैसे दिले, कोणी गाडी दिली, कोणी बैल दिले, कोणी आपले श्रम दिले ! ! गवंड्याने, सुताराने, साऱ्या कलावंतांनी आपली कला खर्चून हे मोहन मंदिर उभारले आहे बरे ! आतील जमीन करण्यास मुलांनी हातभार लावला आहे.

इमारतीबरोबरच आतील सजावट पाहा ! तुम्हांला जेथले सामान तेथे दिसेल ! असलेले साहित्य स्वच्छ व टापटिपीने ठेवलेले आढळेल. वर्गातील तक्ते वा चित्रे आकर्षक रीतीने लावलेली दिसतील ! आणि तक्त्यांची, थोर पुरुषांच्या फोटोंची उगीच गर्दी नाही दिसणार तुम्हांला ! प्रत्येक वर्गात एकच फोटो ! आणि त्याशेजारी त्या विभूतीचे थोडक्यात चरित्र व कार्य लिहून तेही एका फ्रेममध्ये बसविलेले आढळेल तुम्हांला ! ती थोर विभूती व तिचे कार्य सदैव डोळ्यांपुढे राहिल्यामुळे मुलांना स्फूर्ती मिळावी, हे स्वाभाविकच आहे.

तक्ते व चित्रे लावणे म्हणजेच शाळेची सजावट चांगली करणे असे मात्र नव्हे बरे का ! याबरोबरच आमचा रोजचा परिपाठ चालू असतो ना, त्या वेळी ' सफाई व सजावट ' ही कामे आम्ही संघवार करीत असतोच. प्रत्येक वर्गात यासाठी पाच संघ असतात. या संघांना थोर पुरुषांची नावे दिलेली असतात ! मुलींच्या संघांना प्रसिद्ध स्त्रियांची

नावे दिलेली असतात ! शाळेतील सर्व कामे आम्ही, मुले व मुली मिळूनच करतो; त्या वेळी ही संघांची योजना फारच उपयोगी पडते. कामे करताना मुलांमुलींचे फारच चांगले सहकार्य राहाते. भेदभाव न ठेवता सर्वजण आपापली कामे चोख पार पाडतात. मुलेदेखील जमीन सारवतात. रांगोळ्या काढतात ! अर्थात त्या कामातील सफाई व कौशल्य मुलींइतके मुलांना येत नाही हे खरे ! पण सारवायचे काम ना ? मग, ते मुलींनीच केले पाहिजे, अशी भावना मात्र आमच्यात नाही !

आमचा परिपाठ संपल्यानंतर जर तुम्ही आलांत, तर तुम्हांला सर्वत्र प्रसन्नता दिसेल. सर्वत्र स्वच्छता व टापटीप आढळेल. जसा प्रत्येक वर्ग, तसेच शाळेचे आवार ! तसेच शाळेसमोरील मैदान ! कागदाचा कपटा नाही दिसणार तुम्हांला पडलेला इकडे तिकडे ! आता काही मुले टाकतात केरकचरा मधून मधून कोठेही ! पण समंजस मुलांच्या ते लक्षात आले की, ती लगेच कचरा उचलून कचऱ्याच्या टोपलीत नेऊन टाकतात ! आणि अयोग्य ठिकाणी कचरा टाकणारा मुलगा दिसला, तर ती मुले त्याला समजावूनही सांगतात ! अशा वेळी चुकलेल्या मुलांना दोष दाखविणाऱ्यांचा राग मुळीच येत नाही. उलट आपली चूक कळल्यामुळे त्याला वाईट वाटते व तशी चूक पुन्हा होऊ नये म्हणून तो चांगलीच काळजी घेतो.

अशा प्रकारची सर्व शिकवण आम्हांला आमच्या गुरुजींपासूनच मिळते. आमचे गुरुजी खरोखरच अतिशय प्रेमळ आहेत. पाहावे तेव्हा आनंदी, हसतमुखच दिसतील. बोलणेही किती गोड व आपलेपणाचे ! जणू काय आम्ही त्यांची पोटची मुलेच आहोत, इतक्या वात्सल्याने ते आमच्याशी वागतात ! मग आम्ही मुले-मुलीदेखील अगदी सख्ख्या भावा-बहिणींप्रमाणे का बरे वागणार नाही ?

सर्व प्रकारची कामे आम्ही सर्व मिळून करतो ! सहलीला जातो. सहभोजन — स्वत: स्वयंपाक करून — करतो. आम्हांला त्याचे काहीच वाटत नाही ! आम्हांला एवढे माहीत आहे की, आम्ही सारे मोहन मंदिरांतील आहोत ! अगदी एका आईच्या लेकरांप्रमाणे आहोत !

आमचे हे वागणे पाहून सारा गाव आमच्यावर खूष आहे ! ही मोहन मंदिरातील मुले ना ? मग चांगली वागणारच ! साऱ्या गावाला आमच्या शाळेचा अभिमान वाटतो. मग आम्हांला आमच्या शाळेचा अभिमान का बरे वाटणार नाही ?

## २ : समग्र कताई

आज समग्र कताईचा तास होता. त्या वेळी वर्गात खूपच गडबड उडाली. प्रत्येकासाठी एक तोळ्याची कापसाची पुडी गुरुजींनी बांधून ठेविली होती; पण ती घेताना जणू काय आपणांस पुडी मिळते की नाही अशा पद्धतीने साऱ्या मुलांनी गडबड केली.

प्रत्येकाला सळीफळीचा एक जोड होता, पण तो घेतानाही मुलांनी गडबडगोंधळ केला. कोणी फळ्या पाडल्या तर कोणी सळ्या आपटल्या. सळ्यांचा आवाज खूप झाला. फळ्यांचाही आवाज खूप झाला. त्यात मुलांच्या आरडाओरड्याची भर ! तीच गोष्ट पेळूपाट, पेळूसळी व हात्था घेताना ! प्रत्येकासाठी एक जोड होता व तरीही का कोणास ठाऊक चांगली पेळूसळी आपणांस मिळावी म्हणून

मुलांनी त्या ठिकाणी खूपच गर्दी केली. पेळू सळ्यांची हिसकाहिसक झाली ! त्यात एकदोन मुलांची थोडीशी लठ्ठालठ्ठीही झाली ! काही मुलांनी दोन दोन पेळूसळ्या घेऊन ठेवल्या ! त्यामुळे काहींना पेळू-सळीच मिळाली नाही ! तीच गत धनुकल्यांची ! सर्वांच्या धनुकल्या सारख्याच, पण त्या घेतानाही कोण हिसकाहिसक ! त्यात एक-दोन धनुकल्यांच्या दोऱ्याही तुटल्या ! साधा लिंबाचा पाला तो काय ? पण " मला ! मला ! " म्हणून मुलांनी एकच गर्दी केली. जणू काय ती खाण्याची वस्तूच आहे !

सामान घेताना ही गडबड तर काम करताना निराळे काय असणार ? कापूस साफ करण्याच्या फारसे भानगडीत न पडताच काहींनी एकदम रेचावयास सुरुवात केली. काहींनी कापूस कसाबसा रेचला आणि कसा तरी रेचून टाकला ! त्यात फुटक्या सरक्या तशाच राहून गेल्या ! तर काहींनी पिवळा व कच्चा कापूस तसाच राहू दिला ! पत्ती तर बऱ्याच जणांच्या कापसात स्पष्ट दिसत होती ! तीच कथा पिंजणाची ! लिंबाचा पाला घेताना कोण धांदल व घाई ! पण पिंजण्यापूर्वी तो दोरीला घासण्याचे भान होते कोणाला ? ज्यांनी घासला त्यांनी तो घासण्यासाठी जणू आवच आणला असावा ! त्या पाल्याचे बारीक तुकडे रुईत मिसळले तरीदेखील त्यांचे आपले पाला चोळणे सुरूच ! आणि पिंजणाची गुरुजींनी शिकविलेली पद्धत राहिली बाजूला, आणि कसाबसा पिंजून टाकला झाले कापूस ! पेळू करण्याचीही कोण घाई ! केव्हा एकदा पेळू करून संपवू, असे प्रत्येकास झालेले. मग पेळू चांगले होतात की वाईट याची पर्वा करतो कोण ? तीच तऱ्हा कातताना ! सर्वांच्या टकळ्या भराभर फिरू लागल्या, सूत निघू लागले, ते भरभर गुंडाळलेही जाऊ लागले ! पण सूत कसदार

आहे का ? ते समान आहे का ? एवढे पाहतो कोण ? कच्चे, असमान सूत निघू लागले ! निघताना तुटू लागले ! तुटलेले कसे तरी जोडले जाऊ लागले ! कारण, भराभर सूत काढून पेळू संपविण्याची घाई प्रत्येकास झालेली ना ? कामाच्या वेगाकडेच सर्वांचे लक्ष ! कामाचा दर्जा मग पाहतो कोण ?

बरे, हा वर्ग तरी लहान मुलांचा होता काय ? छे हो ! वर्ग होता ७ वीचा ! मग, हे असे कसे झाले ? आणि गुरुजींना तरी हे सारे पाहवले कसे ? त्याचे कारण काय आहे ?

या वर्गाची आज पूर्वपरीक्षा होती ! मग गुरुजी कसे बोलतील ? त्यांचे काम फक्त मुलांवर देखरेख करण्याचे ! आणि मुलांचे लक्ष सारे परीक्षेवर ! म्हणजे काम कोण लवकर संपवतो त्यावर ! मग असा गोंधळ उडणारच !

बरे, काम संपल्यावर तरी नीटनेटकेपणा हवा होता ना ? पण तेथेही सारा असाच प्रकार दिसला ! घंटा होताच, पेपर संपवून निघून जातात त्याप्रमाणे मुले गेली. त्यांची आसने व उपकरणे जागच्या जागीच ! कशी तरी अस्ताव्यस्त पडलेली ! भोवताली लिंबाच्या पाल्याचा, कापसातला कचरा विखुरलेला ! कापसाचे तंतू व धागेही इतस्ततः पसरलेले ! अधूनमधून सरकीही इकडे तिकडे पडलेली ! मुले गेल्यानंतरचा हा देखावा मनाला फारच उदास व निराश करणारा असाच होता ! !

आमच्या मोहन-मंदिरातील कोणाही मुलाने हा देखावा पाहिला असता तर त्याला हसू आले असते, आणि वाईटही वाटले असते ! कारण मूलोद्योगाचे काम करताना त्यांना विशिष्ट प्रकारचे वळण

लागलेले आहे ! तशी त्यांना पहिल्या इयत्तेपासूनच शिस्त लावण्यावर येथे कटाक्ष असतो. नुसत्या मूलोद्योगापेक्षा मूलोद्योगातून लागणाऱ्या या चांगल्या सवयींवरच फार भर दिला जातो. कामाच्या वेगापेक्षा कामाचा दर्जा व कामाची पद्धत हीच अतिशय महत्त्वाची मानली जाते ! आणि आश्चर्य हे की, त्यामुळे दोन्हीही गोष्टी चांगल्या साधतात ! आमच्या मंदिरातील कताईचा तास कसा चालतो हे ऐकावयाचे आहे का तुम्हांला ? ऐका तर मग——

मोहन-मंदिराच्या सातवीच्या वर्गाची आज समग्र कताईची पूर्व-परीक्षा होती. घंटा होताच सर्व मुले वर्गात आली. प्रत्येकाने ठरलेल्या ठिकाणाहून आपापले बसावयाचे आसन घेतले. सारीजणे आपापल्या जागी बसली. पाच रांगा होत्या त्यांच्या. प्रत्येक रांगेत सहा मुले. सर्वांत पुढे गटनायक बसलेला. गुरुजींच्या टेबलाजवळ प्रत्येकासाठी कापसाची एकेक तोळ्याची पुडी बांधून ठेवलेली. प्रत्येकाच्या उपकरणा-वर क्रमांक घातलेला ! आणि सारी उपकरणे ओळीने व व्यवस्थित-पणे मांडून ठेवलेली !

एक घंटा वाजली. सर्व गटनायक आपापल्या जागेवरून उठले. आपल्या गटातील मुलांच्या संख्येइतक्या पुड्या घेऊन त्यांनी त्या मुलांना वाटल्या.

उपकरणेही वाटली. गडबड नाही, गोंधळ नाही, आदळ-आपट नाही, की हिसकाहिसक नाही ! सारे काम शिस्तीने व शान्ततेने पार पडले. गटनायकांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

पुन्हा घंटा झाली. मुलांचे काम सुरू झाले. कापूस साफ करण्या-पासून कताईपर्यंतच्या सर्व क्रिया मुलांनी काळजीपूर्वक केल्या. कामाच्या वेगापेक्षा कामाच्या दर्जाकडेच प्रत्येकाचे लक्ष ! कसे तरी काम

उरकण्यापेक्षा शिस्तीने, टापटिपीने व पद्धतशीरपणे काम करण्यावर प्रत्येकाचा कटाक्ष! किती काम केले? ह्यापेक्षा कसे काम केले, यालाच खरे महत्त्व असल्याची प्रत्येकास जाणीव!

कापूस साफ करताना तंतू तुटू नयेत म्हणून प्रत्येकाने काळजी घेतली. रेचताना सरकी फुटू नये म्हणून दक्षता बाळगली, आणि फुटलीच एखादी तर रेचाई लगेच थांबवून ती फुटकी सरकी कापसातून पूर्णपणे हळुवार हाताने काढून टाकून मगच पुन्हा रेचावयास सुरुवात! पिंजणातही तीच पद्धत, तीच टापटीप! दोरीला पाला चोळल्याशिवाय पिंजणाला कोणीच सुरुवात केली नाही, आणि पाला चोळून होताच तो सर्व कचरा बाजूस करून ठेवण्याची दक्षता प्रत्येकाने घेतली. पिंजताना रुईतील प्रत्येक गाठ न् गाठ चांगली पिंजली जावी म्हणून कोण दक्षता! पेळू करतानाही तीच पद्धत. पेळूपाटावर पोल ठेवून पेळूसळीतून पेळू काढून घेईपर्यंत सारी कामे कशी अगदी चोख! पेळूसळीवरून हात्था फिरवताना कोठेही 'खाड् खड् खड्' असा आवाज नाही. इतकी कुशलता प्रत्येकाच्या अंगी आलेली! प्रत्येकाच्या पेळूस एक विशिष्ट प्रकारची तकाकी आलेली! सारे पेळू मध्यम—नरम! सूत काढायला सुरुवात करावयाचा अवकाश, की गाईच्या आचळातून शुभ्र धारा निघाव्यात त्याप्रमाणे सूत निघू लागले. ते गुंडाळतानाही प्रत्येकाचे कौशल्य दिसे. गुंडाळण्याचा वेग चांगला आणि पद्धतही चांगली. प्रत्येकाची तकली पाहिली तरी तीवर गुंडाळलेले सूत शंक्वाकृतीच दिसणार! आणि सूत तरी कसे अगदी समान! अगदी कसदार! अधूनमधून तुटायचेच! पण तुटले की तकली थांबलीच म्हणून समजावे. तुटलेले सूत नीट काळजीपूर्वक जोडून मगच तकली सुरू होणार! चांगले जोडले गेले नाही, तर ते डोळ्याला खपायचे नाही, मनाला रुचायचे नाही!!

कातणे संपले. अटेरनवर गुंडाळणे सुरू झाले ! त्या वेळी पूर्वीचीच टापटीप व पद्धत दिसली !

थोडक्यात म्हणजे, सफाईपासून कताईपर्यंत सर्व मुलांनी टापटीप, नीटनेटकेपणा व पद्धतशीरपणा यांवरच कटाक्ष ठेवल्याचे आढळून आले. आता या सर्व गोष्टी साधूनही प्रत्येकजण वेगासाठी प्रयत्न करीच ! आणि प्रत्येकाच्या वेगात कमीअधिक फरक पडणारच ! आणि तसा तो पडलाही ! पण वेग वाढावा म्हणून कसे तरी काम उरकण्याकडे कोणाचाच कल दिसला नाही.

वेळ संपला. घंटा झाली. काम थांबले. प्रत्येकाने आपापली उपकरणे आपापल्या जागेवर ठेवली. ठेवताना धनुकल्यांच्या दोऱ्या अगदी स्वच्छ दिसल्या ! पाहून वाटावे की जणू काय त्याच्या साह्याने पिंजण झालेच नाही ! दोरीभोवतालची तंतूंची वेटोळी असतील तर ती काढून टाकल्याशिवाय धनुकली ठेवून देण्याचा विचारच कोणाला येणार नाही, इतकी सवय सर्वांनाच लागलेली. स्वाभाविकच, काम होताच प्रत्येकाने आपली उपकरणे व्यवस्थित रीतीनेच योग्य जागी ठेवून दिली.

भोवतालचा कचरा ज्याने त्याने गोळा केला. बाजूस ठेवलेल्या कचऱ्याच्या टोपलीत टाकला. सरकीच्या टोपलीत सरकी टाकली, आणि सर्व मुले वर्गाबाहेर शान्तपणे निघून गेली. येताना वर्ग स्वच्छ ! सारे सामान जेथल्या तेथे ठेवलेले ! कोणी येऊन पाहिले आणि त्यांना सांगितले की येथे आता समग्र कताईचा तास झाला आहे, तर ते त्याला सांगूनदेखील खरे वाटायचे नाही.

पण सवयीने, अभ्यासाने या सर्व गोष्टी मोहन मंदिरातील मुलांच्या अंगवळणी पडल्या आहेत. त्यांचे रोजचे तासच मुळी याच पद्धतीने

होतात ! आणि सातवीच्या मुलांना आज सात वर्षे ह्या शिस्तीच्या चाकोरीतून जावे लागलेले आहे ! येथील सर्वच गुरुजींचा, सर्वच वर्गांतून, आणि सर्व काळ हाच कटाक्ष असतो. मूलोद्योगातून मुलांना चांगले वळण लागावे, चांगल्या सवयी लागाव्यात, हीच त्यांची दृष्टी असते; मग तुम्हीच सांगा पाहू— इतक्या वर्षांत या मुलांची या पद्धतीने इतकी प्रगती होणे अशक्य आहे का ?

## ३ : अरविंदाची गोष्ट

मोहन मंदिरातील मुले झाली म्हणून ती काही प्रथमपासून सुधारलेली नसतात. शाळेत आल्याबरोबरच ती एकदम चांगल्या रीतीने वागू लागतात असे नाही. त्यांच्यातही इतर मुलांप्रमाणेच अवखळपणा, खोडकरपणा किंवा सहजप्रवृत्तींना धरून घडणारी लबाडी, चोरी इ. गोष्टी असतातच ! पण त्या ओळखूनच मंदिरातील शिक्षक अतिशय हळुवारपणाने व कौशल्याने त्या मुलांतून दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात. मोहन मंदिरातील गुरुजी या बाबतीत फारच कुशल आहेत. त्यामुळे अपराधी मुलांनादेखील ते आवडतात ! त्यांच्या काही गोष्टी आता आपणांस सांगावयाच्या आहेत.

कताईचा तास होता. मुले आपापल्या कामात गुंतली होती. इतक्यात ‘ गुरुजी, हा पाहा अरविंद, मला पेळूसळी देत नाही ! ’ सोमनाथाने तक्रार केली. ‘ गुरुजी, हा अरविंद नेहमी असंच करतो. ’

सदाशिवने त्याला साथ दिली. ‘ स्वतःला तर काही येत नाही, पण चांगलं सामान घेऊन ठेवण्याची मात्र भारी हाव ! ’ सुभाषने अरविंदाला उद्देशून टोमणा मारला.

‘ गुरुजी, हा अरविंद असाच आहे ! ’ सर्व मुलांचा आवाज आला. ‘ अरे अरविंद, देऊन टाक तू पेळूसळी त्याला ! ’ गुरुजी बसल्या जागेवरूनच, पण त्याच्याकडे बारकाईने पाहात बोलले, ‘ तुझे अजून पिंजण व्हायचं आहे ना ? मग आतापासून कशाला ठेवून घेतोस ती पेळूसळी ! सोमनाथाचं काम होताच तो देईल तुला ती परत ! ’

गुरुजी इतके बोलले, पण अरविंद मात्र स्तब्धच ! खाली मान घालून अगदी जीवावर आल्याप्रमाणे त्याचे आपले कसे तरी पिंजण चालूच ! ‘ गुरुजी, पाहा ना हा अजून देत नाही ! ’ सोमनाथाने तक्रार मांडली. ‘ मजजवळ नाही गुरुजी पेळूसळी ! ’ किंचित मान वर करून पण खालचा ओठ दाताखाली दावून अरविंद उद्गारला. परत खाली मान घालून आपल्या कामाला लागला.

‘ गुरुजी, हा खोटं बोलतो आहे ! त्याच्या पिशवीत आहे पेळूसळी ! ’ अरविंदाच्या शेजारची दोनचार मुले एकदम ओरडली. ‘ पेळू पाहावे तर किती घाणेरडे आणि पेळूसळी मात्र हवी सर्वांत चांगली ! ’ सुभाषने पुन्हा अरविंदाचे बिंग उघडे केले. आणि खरोखरच अरविंदाला मूलोद्योगाच्या तासाला कोणत्याच क्रिया नीटशा जमत नव्हत्या. त्या करीत असताना तो अक्षरशः धडपडत असे. इतर वेळी आनंदी दिसणारा अरविंद मूलोद्योगाच्या तासाला मात्र सुकून जात असे. न्यूनत्वाची चिंता त्याचा प्रफुल्लितपणा करपवीत असे. स्वाभाविकच या तासाला तो बेचैन होत असे, हैराण होत असे,

आणि ‘ कसा तरीच ’ वागे. आताचे त्याचे वागणे अशापैकीच होते.

मुलांच्या तक्रारीवरून त्याने पेळू-सळी घेतली असावी असा गुरुजींना संशय आलाच होता. पण तो खरा की खोटा हे पडताळून पाहावयाच्या आतच सोमनाथाने एकदम अरविंदाच्या पिशवीत हात घातला आणि त्याने तीमधून एक पेळू-सळी काढून दाखविली !

सारा वर्ग ‘ पाहा गुरुजी ! ’ म्हणून एकदम गिल्ला करू लागला, पण अरविंदाला त्याचे काहीच वाटले नाही. आपले काहीच चुकले नाही, या भावनेने पूर्ववत त्याने आपले पिंजण ‘ कसे तरी ’ चालूच ठेवले. इतक्यात त्याला काय वाटले कोणास ठाऊक, त्याने हळूच वर पाहिले. गुरुजींची व त्याची नजरानजर झाली ! अरविंद चमकला, आणि बावरलाही ! गुरुजींनी त्याला अगदी प्रेमळपणाने जवळ बोलाविले. तो उठला, मोठ्या कष्टाने उठला. कपाळावरील घाम त्याने हातानेच पुसला. जड पावलाने गुरुजींच्या जवळ येऊन तो उभा राहिला. खाली मान घालून आणि डोळे मिटून !

गुरुजी आता काय करतील या एकाच भीतीने तो बाळजीव नुसता भेदरून गेला होता. बेचैन होऊन गेला होता.

गुरुजींनी मात्र अतिशय प्रेमभराने, वात्सल्याने त्याच्या पाठीवरून हात फिरविला. त्याला अगदी हळू आवाजात हाक मारली व म्हटले, ‘ बाळ, अरविंद, एवढ्याशा पेळू-सळीसाठी तू लबाडी करतोस ? तुला ही नाही तर दुसरी पेळू-सळी मिळाली असती ! एकाचं काम संपलं की लगेच त्यानं आपलं उपकरण दुसऱ्याला द्यावं हे तर आपलं ठरलेलंच आहे ना ? ’

' पण गुरुजी, या पेळू-सळीशिवाय दुसरीनं मला पेळूच करता येत नाहीत ! ' तो अगदी केविलवाणा चेहरा करून बोलू लागला. त्याच्या डोळ्यांत चट्दिशी पाणी उभे राहिले ! त्याचा तो अगतिकपणा आणि त्याचे ते डबडबलेले डोळे पाहून गुरुजींचेही हृदय भरून आले; आणि खरेच, त्यांचेही डोळे पाणावले ! गुरुजींना अरविंदाचे मन समजले. त्याच्या वागणुकीचा अर्थ त्यांना चांगलाच समजला, आणि त्याच्याशी कसे वागावे याबद्दलही जणू काय एक प्रकारची दिव्य दृष्टी आली. ती पाहण्यासाठीच की काय, सारा वर्ग उत्सुक पण तटस्थ बसून राहिला !

गुरुजींनी अरविंदाला जवळ घेतले, प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरविला आणि सर्व वर्गाला उद्देशून ते म्हणाले,

" बाळांनो, आजपासून ही पेळूसळी अरविंदानंच वापरायची ! मी त्याला आता ही बक्षीस देत आहे. आतापासून ही पेळूसळी अरविंदाची झाली.

या पेळूसळीच्या बदली दुसरी एक मी उद्या विकत आणून वर्गात ठेवीन ! आता आपला अरविंद उद्यापासून या पेळूसळीनं फार चांगले पेळू करील बरं का ! "

आणि खरेच, गुरुजींनी ती पेळूसळी अरविंदाला बक्षीस दिली. हे पाहून वर्गातील सर्व मुले आश्चर्यचकित झाली.

अरविंदालाही आश्चर्य वाटले !

आणि—

गुरुजींनाही आश्चर्य वाटले ! कारण—

दुसऱ्या दिवसापासून अरविंदाला कोणत्याही पेळूसळीने चांगले पेळू करता येऊ लागले !

♣ ♣

# ४ : गुळाची चोरी

आज नेहमीप्रमाणे मुलांना मधली सुटी झाली. सर्व मुले बाहेर धावली. कोणी मैदानावर गेली. कोणी बागेत गेली. कोणी विहिरीवर गेली तर कोणी रस्त्यावरील दुकानाकडे धावली. दुकानाकडे वळणारी गर्दी मात्र आज नेहमीपेक्षा अधिक होती. कारण—

आज दुकानासमोर एक बैलगाडी उभी होती आणि त्या गाडीत काय होते ? गुळाच्या भेल्या ! पिवळा पिवळा धमक गूळ ! पाहताच तोंडाला पाणी सुटावे, इतका पिवळा धमक !

गाडी उभी होती आणि गाडीवान एकेक भेली— एकेक ढेप आत नेऊन ठेवीत होता. गाडीभोवती मुलांनी गर्दी केली होती. काही मुले गुळाकडे आशाळभूतपणाने पाहात होती.

" असला गूळ खायला मिळाला तर ! " सुकऱ्या शिवाला म्हणाला.

" काय पण मौज होईल ! " शिवा कुचकुचला !

" आज आईकडून मी पैसे मागून घेणारच ! " शिवाने मनाशी निश्चय केला. दहा पैसे तरी घेईनच ! पाच पैशांचे शेंगदाणे आणि पाच पैशांचा गूळ ! काय पण मौज येईल नाही रे सुकऱ्या ! " शिवा हळूच म्हणाला.

सुकऱ्याने त्याचे बोलणे ऐकले की नाही कोण जाणे ! तो आपला गप्पच !

सुकऱ्या एक आदिवासी मुलगा होता. तो सरकारने चालविलेल्या आदिवासी मुलांच्या वसतिगृहात राहात होता. शिवाप्रमाणे त्याला पैसे मागून गूळ विकत घेऊन खाणे शक्य नव्हते !

वरीलप्रमाणे सुकऱ्या--शिवाचे हितगुज चालू होते तोच घंटा झाली. सारी मुले आपापल्या वर्गाकडे पळाली. सुकऱ्या मात्र तेथेच घुटमळत राहिला, आणि घुटमळत त्याचे पाऊल गाडीच्या दिशेने पडू लागले.

गाडीवान ढेप घेऊन दुकानात शिरला आणि सुकऱ्याने गाडीतील एका ढेपेवर झडप घातली. हाताने खरडता येईल एवढा तुकडा खरडला ! त्याच्या नखाला झिणझिण्या आल्या ! पण त्याचे काम झाले ! गाडीवान दुकानातून आत यावयाच्या आतच त्याने तो खरडलेल्या गुळाचा भुगा तोंडात टाकलाही ! त्याची इच्छा जणू तेवढ्यानेच तृप्त झाली आणि तो शाळेकडे जावयास निघणार तोच——

" का रे ये ऽ ऽ य कार्ट्या ऽ ऽ ऽ ! " एक म्हातारी कर्कशपणे ओरडली !— इतकी कर्कशून की, वर्गात शिरलेली मुलेदेखील बाहेर येऊन टवकारून पाहू लागली ! त्या धांदलीत सुकऱ्या वर्गात येऊन कान कापल्या कुत्र्याप्रमाणे मुकाट येऊन, चुपचाप रीतीने बसून राहिलाही !

ती म्हातारी त्या दुकानदाराची आई होती. जख्ख म्हातारी होती ती. डोक्याचा केस न् केस पिकला होता तिचा ! चेहेऱ्यावर सुरकुत्यांचे जाळे पसरले होते, आणि तोंडाचे अक्षरशः बोळके झालेले होते. ती बसली होती दुकानातच दरवाजाच्या आतल्या बाजूला, आणि पाहात होती तेथूनच दुकानाच्या फटीतून तीक्ष्ण नजरेने गुळाकडे ! स्वाभाविकच, सुकऱ्याने गुळावर झडप घातली ती तिच्या दृष्टीतून सुटू शकली नाही. त्याला पाहताक्षणीच, उंदीर दिसताच मांजरी ज्या चपळाईने बाहेर येते त्याप्रमाणे टुण्कन उडी मारून ती म्हातारी बाहेर आली ! आणि आपल्या खणखणीत आवाजाने उच्च स्वर काढून, मोठ्याने गर्जू लागली ! नव्हे, शाळेतील मुलांच्या नावाने शिव्यांची लाखोली

वाहू लागली. तिच्या त्या आरडाओरडीने त्या ठिकाणी ही ऽ ऽ गर्दी जमली !

मोहन मंदिरातील मुख्य गुरुजीही आले. त्यांनी बाईंना शान्त करण्याचा प्रयत्न केला. आजपासून मुलांना चांगली ताकीद देतो म्हणून सांगितले. परोपरीने त्यांनी त्या बाईंना समजावण्याचा प्रयत्न केला ! पण कडाडणारी वीज काही केल्या शमेना ! गुरुजी आपले वर्गात येऊन बसले. म्हातारी खूप वेळ तणतण तणतणली ! आणि शेवटी दमल्यामुळे गप्प बसली !

सुकऱ्या—शिवाचे गुरुजीही वर्गात आले. आले ते गंभीर चेहऱ्यानेच ! सर्व मुलांना झालेला प्रकार समजला होताच ! पण " गूळ चोरला कोणी ? " हे मात्र कोणालाच माहीत नव्हते.

गुरुजी शान्तपणे आसनावर बसले. एकच मिनिट पण अगदी गंभीरपणे स्तब्ध राहिले. सारी मुलेही चुपचाप बसून राहिली. गुरुजी बोलू लागले.

" बाळांनो, आज आपल्या शाळेतील मुलांनी काय अपराध केला हे तुम्हांला ठाऊकच आहे. त्या गाडीतील गूळ कोणी खाल्ला हे मला कळेल का ? स्वतःहून त्या मुलानं जर आपलं नाव सांगितलं तर मला फार आनंद होईल."

गुरुजी एवढेच बोलून स्तब्ध झाले. पुन्हा सर्वत्र शान्तता पसरली. मुलांना एकमेकांकडे पाहण्याचेदेखील धैर्य होईना !

इतक्यात हुंदक्याचा—स्फुंदण्याचा आवाज आला ! होय ! तो सुकऱ्याचाच आवाज होता.

सुकऱ्या उभा राहून स्फुंदत स्फुंदत खाली मान घालून बोलला--

' गुरुजी, चूक झाली माझी ! मीच गूळ खाल्ला ! '

' शाब्बास बाळ ! ' गुरुजी आनंदाने एकदम उद्गारले. त्यांचे गांभीर्य दूर झाले. ते प्रसन्न व आनंदी दिसू लागले ! ' ये बाळ, इकडे ये, ' असे म्हणून त्यांनी सुकऱ्याला प्रेमाने जवळ बोलावले आणि आईच्या ममतेने त्याच्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले,

' तू गूळ खाण्याचा अपराध करायला नको होतास, पण तू केलास ! काही हरकत नाही. पण आपला अपराध तू सगळ्यांदेखत कबूल केलास ही फार चांगली गोष्ट केलीस ! अपराध कबूल करण्यासही मनाचा मोठेपणा लागतो. तो तू दाखविला आहेस. आता माझी खात्री आहे की, अशी गोष्ट तू पुन: कधीच करणार नाहीस ! जा, बाळ ! आता जागेवर बैस ! '

एवढे बोलून गुरुजी थांबले. सुकऱ्या डोळे पुशीत शान्तपणे जागेवर जाऊन बसला. गुरुजी सर्व मुलांना उद्देशून पुन्हा बोलू लागले—

' मुलांनो, तुम्ही आता मोठे होत चालला आहात. आज तुम्ही ६ वीत आहात; काही दिवसांनी ७ वीत जाल. तुमच्या या मोठेपणाबरोबरच तुमच्या मनाचा, तुमच्या वागण्याचा मोठेपणाही वाढत गेला पाहिजे. लहान वयात पुष्कळ गोष्टी आपणांस समजत नाहीत. खाण्याची वस्तू दिसली की लहान मुलांना खाण्याचा फार मोह होतो. इतका की, ती वस्तू कोणाची आहे याचाही विचार न करता ती ती घेण्याचा प्रयत्न करतात. अगदी लहान मुलांचे असे वागणे स्वाभाविक आहे. पण आता तुम्हांला असे वागून कसे बरे चालेल ? तुम्ही आता असला मोह जिंकलाच पाहिजे. मनावर एवढा ताबा ठेवलाच पाहिजे. या वयापासून तुम्ही मन जिंकण्यास शिकू लागलात

तरच तुम्हांला आयुष्यात पुढे मोठी कर्तबगारी करता येईल ! एका संस्कृत सुभाषितात म्हटले आहे, ' जितं जगत् केन ? मनोहि येन ! ' त्याचा अर्थ असा—' जग कोणी जिंकले ? तर ज्याने मन जिंकले त्याने ! ' म्हणूनच आपले मन जिंकण्याचा अभ्यास तुम्हांला आतापासूनच करायला नको काय ?

सुकऱ्याच्या प्रसंगापासून तुम्ही सर्वजणांनी एवढा जरी आज निश्चय केला— लहान लहान मोहाच्या गोष्टी जिंकण्याचा— तरी आजचा हा प्रसंग घडला तो आपल्या बऱ्याकरताच घडला, असे आपणास म्हणता येईल ! मग कराल ना असा निश्चय ? मग वागाल ना तुम्ही त्या निश्चयाप्रमाणे ? '

' होय ! होय ! ' सर्व मुलांनी एकदम म्हटले.

' म्हणजे काय करणार ? ' गुरुजींनी विचारले.

' असा गूळ चोरणार नाही ! ' एक आवाज आला.

' अरे बाळ, अशा गुळाच्या गाड्या काय रोज आपणाला दिसणार आहेत ? ' गुरुजी म्हणाले.

' कोणतीच खाण्याची वस्तू अशा रीतीने चोरणार नाही ! ' सुकऱ्या म्हणाला.

' पण असे प्रसंगदेखील तुम्हांला रोज येणार नाहीत. ' गुरुजी म्हणाले, ' केव्हा तरी क्वचितच असे प्रसंग येतात. आणि येतात तेही इतके एकाएकी की, आपण त्या वेळी आपल्या प्रतिज्ञा व आपले निश्चय पार विसरून जातो. यासाठी रोज येणारे पण त्या वेळी आपले मन आपल्या ताब्यात ठेवावे लागेल असे प्रसंग तुम्हांला शोधले पाहिजेत.

असे प्रसंग तुम्हांला शाळेतदेखील येतात. खाण्याच्या वस्तू रोज पाहावयास मिळतात आणि आम्ही सांगूनदेखील तुम्ही आमचे न ऐकता त्या खात असता ! असे कोणते बरे प्रसंग ? येईल का कोणाला सांगता ? '

चाणाक्ष सुभाषने गुरुजींच्या मनातील विचार ओळखला; तो खुदूकन हसला !

' काय रे सुभाष, तू सांगतोस ? तुला कळले आहे मी काय म्हणतो ते ? '

' होय गुरुजी ! ' सुभाष बोलला, ' बागेत काम करताना आम्ही भेंड्या, चवळी आणि फुलवरची भाजीदेखील खातो.'

' बरोबर ओळखले सुभाषने ! ' गुरुजी म्हणाले. ' मग, रोज बागेत गेल्यावर या वस्तू खाण्याचा मोह तुम्हांला होतो. तो तुम्ही जिंकीत नाही. आपले मन ताब्यात ठेवायला शिकविण्याचा धडा देणारा उत्तम तास म्हणजे बागकामाचा तास ! या तासाच्या वेळी हा निश्चय करा ! बागेतील वस्तू सर्वांच्या आहेत. नव्हे तर सर्व शाळेच्या—आपल्या मंदिराच्या आहेत ! त्या एकट्यादुकट्याने खाऊन कसे बरे चालेल ? त्याच ठिकाणी आपण आपले मन ताब्यात ठेवले पाहिजे, मोह जिंकला पाहिजे; आणि इथे तुम्ही एवढे शिकलात की मग बाहेरही तुम्हांला मोह जिंकू शकणार नाही, तुम्हीच त्याला जिंकाल !

मग कराल ना असा प्रयत्न आजपासून ? आज आपला बाग-कामाचा तास आहेच ! ' गुरुजींनी सर्वांना पूर्ण विश्वासात घेऊन विचारले.

' हो ! हो ! ' सर्व मुलांचा आवाज आला. गुरुजींची मुद्रा अधिक आनंदी व प्रसन्न दिसू लागली !

## ५ : दोन भावंडे

पाचवीच्या वर्गात आज परिपाठाच्या वेळी खूप घाई उडाली होती. प्रत्येकजण आपापली जागा सुशोभित करण्याचा प्रयत्न करीत होता. मुलींनी आज मुद्दाम शेणही आणले होते. त्यांनी व्हरांडा सारवून काढला. तेथे सुंदर रांगोळी काढली. या बाबतीत लतिकेने पुढाकार घेतला होता. फारच चुणचुणीत, हुषार व कलावंत होती लतिका ! ती गाणे चांगले म्हणे. तिला काही नृत्येही चांगली येत. तिचे लेखनही चांगले होते. अक्षर म्हणजे जणू मोती. विचारही बालवयाच्या मानाने कौतुकास्पद ! वादविवाद-सभेत बोलण्यातही तिचाच पुढाकार ! भारी सभाधीट ! शाळेतील कोणताही समारंभ असो, सजावटीच्या कामात पुढारीपण तिच्याचकडे जाई ! तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळ्या काढण्यात ती फारच पटाईत होती. आणि उत्साही एवढी की घरून स्वतःच्या खर्चाने निरनिराळ्या रंगाच्या रांगोळ्या आणी आणि वर्गासमोर रांगोळी काढताना अगदी गुंगून जाई. आजही तिने अशीच सुंदर रांगोळी काढली होती. ती पाहून शेजारच्या वर्गातील मुलेमुलीदेखील आनंदित झाली. आज मुलींचे परिपाठाचे काम उत्तम झाले, असे गुरुजींनी वारंवार म्हटले, आणि त्यांनी लतिकेची विशेष स्तुती केली !

पण हीच लतिका मधल्या सुटीनंतर शाळा भरण्यापूर्वी गुरुजींच्या जवळ येऊन रडू लागली. अगदी स्फुंदून स्फुंदून रडू लागली !

तिच्याजवळ तिच्या मैत्रिणीही उभ्या होत्या. एकदोघींचे डोळे पाण्याने डबडबलेले दिसत होते. सर्वांचेच चेहरे अगदी गोरेमोरे झाले होते. एकदोघी रागीट चेहऱ्याने तावातावाने गुरुजींच्याजवळ तक्रार मांडीत होत्या. त्या म्हणत होत्या, ' गुरुजी, आपल्या वर्गातील मुलांनीच हे काम केले असले पाहिजे; किती श्रमाने आम्ही रांगोळी

काढावी आणि यांनी मात्र ती पुसून टाकावी ! मोठी दुष्ट आहेत ही मुले ! '

झालेला प्रकार गुरुजींच्या लक्षात आला. लतिकेने काढलेली सुंदर रांगोळी कुणी मुलाने सुटीत पायाने पुसून खराब केली होती. सुंदर चित्रावर शाई सांडून ते खराब व्हावे त्याप्रमाणे त्या रांगोळीची स्थिती झाली होती. तो त्या रांगोळीचा विद्रूपपणा पाहून लतिकेला धक्का बसला होता. इतका की, तिच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले होते. म्हणूनच ती आपल्या मैत्रिणींसह गुरुजींकडे तक्रार नोंदविण्यासाठी आली होती.

गुरुजींनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. ' मी चौकशी करून या गोष्टीचा योग्य तो बंदोबस्त करतो.' असे त्यांनी आश्वासन दिले. कशीबशी समजूत करून घेऊन लतिका आपल्या जागेवर जाऊन बसली.

मधल्या सुटीनंतर वर्गाचे काम सुरू झाले. मात्र, मुलांना आज गुरुजी नेहमीप्रमाणे प्रसन्न दिसले नाहीत. शाळा सुटेपर्यंत आज ते एकदाही हसले नाहीत. आपापले काम सारेजणच करीत होते; पण त्यात चैतन्य नव्हते; त्यात जिवंतपणा नव्हता. गुरुजींना या स्थितीत पाहून मुलांना कसेसेच वाटले. लतिकेलादेखील असे वाटले की, उगीच सांगितली ही तक्रार आपण गुरुजींना !

दुसऱ्या दिवशी शाळा सुरू होण्याची घंटा झाली. सुरुवातीला नेहमी प्रार्थना होई. मुले आपापली आसने घेऊन प्रार्थनेच्या जागी बसली. भोवताली आम्रवृक्षाची गर्द झाडी होती. त्यांच्या दाट सावलीत उघड्यावरच रोज प्रार्थना होई. मग शाळेचे काम सुरू होई. प्रार्थने-पूर्वी कधी कधी गुरुजी मुलांना गोष्टीही सांगत.

प्रार्थनेच्या जागी गुरुजी आले. आजही त्यांचा चेहरा गंभीरच होता ! ते पाहून मुलांना पुन: कसेसेच वाटले. ती चुपचाप बसली. काहीजण गुरुजीकडे पाहात तर काही जण जमिनीकडे !

गुरुजी आपल्या आसनावर विराजमान झाले. त्यांनी मुलांकडे एकदा डोळे भरून पाहिले आणि ते बोलू लागले,

‘ माझ्या बाळांनो, आज मी तुम्हांला एक गोष्ट सांगणार आहे.’

सशांच्या पिल्लांप्रमाणे सर्व मुलांनी आपापले कान एकदम टवकारले ! सारेजण सावरून ताठ बसले. गुरुजी काय सांगतात तिकडे लक्ष देऊन ऐकू लागले.

गुरुजींनी गोष्ट सांगण्यास सुरुवात केली.

‘ एका घरात दोन मुले होती. एक मुलगा व एक मुलगी. मुलाला सारे म्हणत बाळू. मुलीला म्हणत ताई. दोघे भावंडेच; एकमेकांना खूप आवडत. पण एकत्र आली की खूप भांडत. ‘ तुझ्यावाचून करमेना अन् तुझं माझं पटेना ! ’ अशीच त्यांची स्थिती होई. बाळू ताईच्या फार खोड्या करी. तिची चांगली वस्तू दिसली की तो ती खराब करी. तिच्या पुस्तकाचे कव्हरच फाड ! कुठे तिने काढलेले चित्रच खराब कर ! तर कधी तिच्या परकरावरच शाईचे डाग पाडून ठेव ! असा त्याचा उद्योग नेहमी चालायचा, आणि ताई बोलायच्या आत तोच तिच्या तक्रारी आईजवळ सांगण्यासाठी धावायचा ! असा होता बाळू ! ’

‘ मुलांनो, आवडल का तुम्हांला असला बाळू ? ’ गोष्ट थांबवून मध्येच गुरुजींनी विचारले.

‘ छे, छे ! मुळीच आवडणार नाही ! ’ मुले बोलली. गुरुजींनी आपली गोष्ट पुढे सुरू केली——

दिवाळीचे दिवस होते. भाऊबीजेचा दिवस. ताईने बाळूला ओवाळले. बाळूने ताईला चांगल्या कापडाची ओवाळणी घातली. त्याबरोबरच त्याने ताईला फटाकेही दिले. पण शेवटी घोटाळा करायचा तो केलाच ! स्वत:चे सगळे फटाके संपवून तो ताईचे फटाके मागू लागला. एकदा ताईने दिलेही; पण तेवढ्याने त्याचे कुठे समाधान झाले ! ‘ सगळे मला दे—मीच ते तुला दिले आहेत,’ असे म्हणून तो रडू लागला. सगळे फटाके देण्याचे ताईने साफ नाकारले. स्वाभाविकच बाळू ताईवर खूप चिडला !

आज रात्री तो लवकरच अंथरुणावर पडला. त्याला झोप नव्हतीच; पण ताईचे उट्टे कसे काढावे याबद्दलचे विचार त्याच्या मनात घोळत होते. ‘ मला फटाके देत नाहीस काय ? ठीक आहे ! पाहून घेतो ’ असे म्हणत तो चोरपावलाने बागेकडे वळला आणि थोड्याच वेळात घाई-घाईने परत येऊन अंथरुणावर झोपून राहिला !

सकाळी लवकर उठून ताई नेहमीप्रमाणे झाडांना पाणी घालण्यासाठी बागेत गेली, तो काय ? ताईच्या कुंड्यांतील सर्व झाडे उपटलेली ! ताईला फार वाईट वाटले. तिच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. हा प्रकार कोणी केला असावा हे कळण्यास तिला उशीर लागला नाही ! पण तिने बाळूशी काहीच बोलावयाचे नाही असा निश्चय केला.

बाळूला वाटले, बरे झाले. आपण आज ताईची चांगलीच खोड मोडली !

पण सर्व दिवसभर ताई त्याच्याशी बोलेना. आईही त्याच्याशी जेवढ्यास तेवढेच बोलू लागली. दादाही त्याच्याशी तुटकपणानेच वागू लागले. मग मात्र बाळूला राहवेना. तो बेचैन झाला. त्याला वाटले, ‘ आपले चुकले ! आईने विचारले की चटकन् सांगून टाकावी झाले

आपली चूक !' पण आईने त्याला विचारले नाही आणि दादानेही त्याला विचारले नाही ! सर्व दिवस गेला. रात्र झाली. ताई बाळू मुकाट्यानेच जेवली. आईनेही त्यांना जेवढ्यास तेवढे बोलतच वाढले. जेवणानंतर दोघेही आपापल्या अंथरुणावर जाऊन झोपली.

सारी रात्र बाळूला झोप लागली नाही. झोपेत तो बरळू लागला, ' ताई मला क्षमा कर. मीच झाडे उपटली. माझ्याशी पहिल्यासारखे बोल. मी पुन्हा कधी कधी असे करणार नाही. पण माझ्याशी बोल ! '

आणि सकाळ होताच बाळूने धावत जाऊन ताईचे पाय धरले. झोपेत बरळलेलेच विचार त्याने आता बोलून दाखविले. त्याने ताईची क्षमा मागितली. आई-वडिलांच्या जवळही त्याने आपली चूक कबूल केली. सर्वांनीच त्याला क्षमा केली. त्या वेळी पुन: घरात आनंदी-आनंद झाला !

त्या दिवसापासून बाळूने ताईची कधीच खोडी केली नाही. त्या दोघांचे प्रेम वाढतच गेले. बहिण-भावंडे इतक्या प्रेमाने वागू लागली की, सारे शेजारी म्हणत, ' बहीण-भाऊ असावेत तर बाळू-ताईसारखे !' ' गुरुजींनी गोष्ट संपविली. ते थोडा वेळ थांबले. त्यांनी मग विचारले, ' मुलांनो, आज ही गोष्ट सांगण्यात माझा काय उद्देश असावा बरे ?' गुरुजींचा प्रश्न ऐकून मुले विचारात पडली. ती एक-मेकांकडे पाहू लागली. लतिका आपल्या मैत्रिणींकडे पाहू लागली ! गुरुजीच पुन: बोलू लागले—

' काल आपल्या मंदिरात असाच प्रसंग घडला आहे. मुलांनो, तुम्ही सारेजण येथे मंदिरात बहीण-भावंडांप्रमाणेच आहांत. या साऱ्या मुली तुमच्या बहिणी ! मुलींनो, ही सारी मुले म्हणजे तुमचे भाऊ ! तुम्ही सर्वांनी बाळू-ताईप्रमाणेच वागले पाहिजे—

काल या लतिकेने आपल्या वर्गासमोर किती सुंदर रांगोळी काढली होती हे तुम्हांला सर्वांना ठाऊक आहे. पण मधल्या छोट्या किंवा मोठ्या सुटीत कोणी मुलाने ती रांगोळी खराब केली. एक-दोनदा असाच प्रकार मागेही घडला आहे. गोष्टीतील बाळू जसा ताईला प्रथम त्रास देई, तसाच त्रास देणारा बाळू आपल्यामध्येही असला पाहिजे. बाळू प्रथम खोडकर होता पण त्याने आपल्या खोड्या पुढे सोडून दिल्या ! बाळू—ताई ही तुमच्याच वयाची मुले होती ! बाळूला जे शक्य झाले ते तुम्हांला का होणार नाही ? मात्र, बाळूप्रमाणे चांगले वागण्याचा निश्चय केला पाहिजे ! मग काय, रांगोळी कोणी पुसली त्याचे नाव कळेल का मला ? '

एवढे बोलून गुरुजी स्तब्ध बसले. सर्वत्र शान्तता पसरली !

पटकन एक छोटासा मुलगा उभा राहिला ! खाली मान घालून तो बोलला, ' गुरुजी, मी चुकलो ! मीच रांगोळी पुसली. येथून पुढे मी बाळूप्रमाणेच चांगला वागेन.'

' शाब्बास बाळ ! ' आनंदभराने गुरुजी उद्गारले. ' मी आज तुम्हांला बाळू—ताईची गोष्ट सांगितल्याचे सार्थक झाले. प्रथम खोडकर असणारा बाळू जसा शहाणा झाला तसेच तुम्हीही व्हा आणि एक-मेकांशी नेहमी प्रेमाने वागा. इतके की, गावाने तुमची स्तुती करावी आणि म्हणावे, ' वा ! मोहन-मंदिरातील मुले आणि मुली ना ?—सख्खे बहीण-भाऊ काय वागतील,— असे वागतात परस्परांशी.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि. ৭।০.৭১
क्रमांक ................ नोंद दि. 3.01.3.1.69

## ६ : चिडवाचिडवी

आज खेळाच्या तासाला खूपच गडबड उडाली. गुरुजी मुख्याध्यापकांच्या खोलीत सभेसाठी गेले होते. मुले आपआपसात खेळत होती. पाचवी-सहावीची मुले एकत्र खेळत होती. हुतुतूचा डाव चालला होता. वीरश्रीला चेतावणी देणारा म्हणून की काय पण हुतुतूचा खेळ मुलांचा भारी आवडीचा. इतर खेळ कितीही मनोरंजकपणे शिकविले तरी त्यात हुतुतूची मजा नाही, ही आपली मुलांची तक्रार कायमच ! स्वाभाविकच वेळ स्वतंत्रपणे मिळाला की मुलांचा खेळ सुरू व्हायचा म्हणजे हुतुतूचाच !

असाच आजही हुतुतूचा खेळ सुरू झाला होता; मुलांनीच आपआपसात गड्यांची वाटणी केली होती. काही बघ्ये म्हणूनच बाजूस उभे होते. मैदानही आवश्यक तेवढे आखले होते, आणि खेळ सुरू झाला होता. थोड्याच वेळात डाव मोठा रंगात आला. हुतुतूचा खेळ रंगात येतोही लवकर आणि त्या रंगाचा भंग व्हावा असे प्रसंगही त्यातून उद्‌भवतात तेही लवकरच ! असाच एक प्रसंग घडला.

एका बाजूच्या गड्यांनी चढाई करून येणाराला पकडले. चांगलेच पकडले. त्याने सुटण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. त्यात हिसकाहिसक झाली. रगडा-रगडीही झाली ! पण चढाई करणारा काही सुटू शकला नाही. तो बाद झाला. बाजूला जाऊन बसला.

पण त्याला धरून बाद करणाऱ्या बाजूच्याच दोन मुलांची तक्रार सुरू झाली. धरण्याच्या प्रयत्नात एकाचा कोपर दुसऱ्याच्या कपाळाला सणकून लागला होता. त्यामुळे त्याने त्याला दिला एक गुद्दा लगावून ! त्यानेही आपल्यावर झालेल्या हल्ल्याचा प्रतिकार तितक्याच त्वेषाने केला ! दोघांनाही चांगलीच वीरश्री आली. खेळ राहिला बाजूला

आणि दोघांची जुंपली झोंबी. बाकीच्या मुलांनी त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला म्हणून बरे, नाही तर इतुतूच्या मैदानाला कुस्तीच्या आखाड्याचे स्वरूप येण्यास काही फारसा अवधी राहिलेला नव्हता !

दोघांची उभी झोंबी सुटली खरी, पण दोघांनीही लगेच आप-आपले तोंडपट्टे सुरू केले ! ते मात्र काही केल्या थांबेनात !

सुपड्डू कडाडला—' डोळ्याने एकाक्ष पण ऐट किती ! '

उखड्डू गरजला—' माझी कशाला ऐट काढतोस ? तुझा रंग नाही का कोळशासारखा काळा ! आणि नाक बसलेले सगळे गालात ! मी एकाक्ष तर तू नकटा आणि कोळशासारखा काळा ! '

' मी नकटा असेन, पण तू तर उखड्डू—उकिरडे फुंकणारा ! ' सुपड्डूने हल्ला चढविला.

' मी उकिरडे-फुंक्या तर तू सुपड्या ! सुपं तयार करायचा धंदा सोडून इथं कशाला आलास शाळेत ? ' उखड्डूने हल्ला परतवला.

अशी दोघांची झटापट सुरू झाली. एकमेकांची शारीरिक व्यंगे व नावे यांच्यावर कोट्या करून त्यांनी शाब्दिक बाणांचा परस्परांवर सारखा वर्षाव चालविला, तो काही केल्या थांबेना ! दोघांनाही इतका कैफ चढला की, गुरुजी तेथे येऊन ऐकत आहेत याचेही त्यांना भान राहिले नाही !

अखेरीस गुरुजी आल्याचे त्यांना कळताच त्यांची शाब्दिक झुंजही थांबली. गुरुजींजवळ दोघेही आपआपले गाऱ्हाणे गाऊ लागले ! मुलां-मध्येही कोणी सुपड्डूच्या बाजूने तर कोणी उखड्डूच्या बाजूने बोलू लागले.

गुरुजींनी सर्वांचे म्हणणे शान्तपणे ऐकून घेतले आणि सुपड्ड—उखड्डूंना उद्देशून ते म्हणाले, ' बरे, आता तरी तुम्ही शान्तपणाने घरी जाणार का ? अजून एकमेकांचे काही उणेदुणे काढायचे राहिले असेल तर इथेच माझ्यादेखत काढून घ्या; पण शाळेच्या आवाराच्या बाहेर मात्र हे दृश्य दिसता कामा नये ! '

गुरुजींच्या या बोलण्यामुळे ते दोघेही लाजले ! शरमले !

घरी जाताना शान्तपणाने जाण्याचे त्यांनी कबूल केले !

घंटा झाली, शाळा सुटली, मुले आपआपल्या घरी गेली. सुपड्ड—उखड्डूही शान्तपणाने घरी गेले. आपल्या हातून आज फार मोठी चूक झाली याची रुखरूख दोघांनाही लागून राहिली !

दुसऱ्या दिवशी प्रार्थनेच्या पूर्वी सर्व मुलांना उद्देशून गुरुजी बोलू लागले——

' मुलांनो, काल आपल्या वर्गातील सुपड्ड—उखड्डूचे खेळताना भांडण झाले, हे तुम्हांला ठाऊक आहेच ! त्याबद्दल त्यांनाही नंतर फार वाईट वाटले. दोघेही मिळून काल रात्री माझ्या घरी आले होते ! त्यांनी माझी व तुम्हां सर्व मुलांची क्षमा मागितली ! मी अर्थातच त्यांना क्षमा केली; पण मला जे काही त्यांना काल सांगायचे होते ते उद्याच सगळ्यांदेखत सांगेन, असे मी त्यांना म्हटले होते. तेच मी आज तुम्हां सर्वांनाच सांगू इच्छितो.

' मुलांनो, तुमचे वय अजून हूडपणाचे आहे, हे मला कळते. या वयात खेळताना काय किंवा इतर वेळेस काय तुमची आपापसांत भांडणे व्हायचीच; पण काल सुपड्ड—उखड्डूंनी भांडणात एकमेकांना उद्देशून जे अपशब्द वापरले त्याबद्दल मला फार वाईट वाटले. उखड्डूचा

एक डोळा देवीमुळे गेला आहे म्हणून त्याला सुपडूने ' एकाक्ष ' म्हणून हिणविले, तर सुपडूचे नकटे नाक व काळा रंग उखडूने काढला ! दोघांनी परस्परांच्या नावांवरूनही एकमेकांना अपशब्द वापरले, ही गोष्ट अत्यंत गैर झाली. त्या दोघांची अशीच मधून मधून बोलाचाली होते असे मला कळले, त्यामुळे मला फार वाईट वाटले, दुःख झाले !

' मुलांनो, आपण वेळप्रसंगी एकमेकांना गंमतीने चिडवितो; पण चिडविण्याचा हा प्रकार सर्वांत निंद्य आहे. उखडूला परमेश्वराच्या अवकृपेमुळे डोळ्याला मुकावे लागले, तर सुपडूच्या नाकात व्यंग निर्माण झाले ही शारीरिक व्यंगे कोणालाच दूर करता येत नाहीत ! तसेच त्यांच्या नावाचेही आहे. बाह्य नावावरून का कधी माणसाच्या गुणांची पारख होत असते ? ' नाव सोनुबाई असून हाती कथलाचा वाळा असू शकतो ' तर याउलट ' वेष बावळा असून अंगी नाना कळा असू शकतात ! ' म्हणूनच, कोणाचेही शारीरिक व्यंग पाहून त्याला हसता कामा नये ! मग चिडविणे तर फारच वाईट. जो दोष प्रयत्न करून दूर करता येण्यासारखा आहे त्याबद्दल एखाद्यास चिडविले तर चालेल ! कोणी आळशी असला किंवा कोणाचे अक्षर वाईट असले, किंवा कोणी गबाळ्या असला तर त्याला चिडविले तर चालेल ! त्या चिडविण्यामुळे ती मुले आपआपले दोष दूर करण्याचे प्रयत्न करू शकतील, आणि सतत प्रयत्नामुळे ते कायमचेही दूर होऊ शकतील ! पण कितीही प्रयत्न केले तरी उखडूला डोळा येणे शक्य नाही ! आणि सुपडूचा रंग गोरा होणे शक्य नाही ! म्हणूनच—

' बाळांनो, आजपासून चांगले लक्षात ठेवा ! तुमची या वयांत परस्पर भांडणे होतील— एकमेकांना चिडवावेसे वाटेल ! पण चिड-विताना किंवा भांडताना एकमेकांच्या शारीरिक व्यंगांचा चुकूनदेखील

उल्लेख करू नका ! एवढे लक्षात ठेवून तुम्ही या वयापासून निश्चयाने वागू लागलात तर तुम्ही मोठेपणी चांगला नावलौकिक मिळवाल ! '

गुरुजींचे बोलणे थांबले. झाल्या प्रकाराबद्दल सुपडू–उखडूंना फार वाईट वाटले; पण गुरुजींच्या या भाषणाचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम झाला ! आता ते दोघे परस्परांस अशा प्रकारे कधीच चिडवीत नाहीत ! एवढेच नव्हे, तर मोहन-मंदिरातील कोणताही मुलगा दुसऱ्या मुलाच्या शारीरिक व्यंगांना हसत नाही, मग त्याच्या शारीरिक व्यंगावरून त्याला चिडविण्याची गोष्ट तर दूरच ! !

## ७ : मोहन-मंदिरास भेट

मुलांनो, मोहनमंदिरातील मुलांच्या काही गोष्टी तुम्ही ऐकल्या. त्यामुळे ती मुले व ते मोहन-मंदिर पाहावे अशी तुमच्या मनांत इच्छा निर्माण झाली असेल, नाही ? प्रत्यक्षात हे पाहणे कितपत शक्य होईल हे मला सांगता येत नाही; पण तुमची जर कल्पनेच्या विमानात बसायची तयारी असेल तर मात्र तुम्हांस मोहनमंदिरास आत्ताच्या आत्ता भेट देणे शक्य होईल. आहे ना तुमची तयारी ? चला तर मग........

हे पाहा आले आमचे मोहन-मंदिर. पाहिलीत ही सर्व मुले. तुमच्या-सारखीच दिसताहेत ना ? आज आपली अनायासेच सोय झाली आहे. कारण ती सर्व मुले आज एकत्र जमलेली दिसत आहेत. इ. ४ थी

ते ७ वीचे सर्व वर्ग या ठिकाणी सभेसाठी जमलेले आहेत. आज लोकमान्यांची पुण्यतिथी आहे ना ? मोहन-मंदिरात लोकमान्यांची पुण्यतिथी साजरी होत आहे.

पाहा, त्या मुलांचा पोषाख कसा साधा पण स्वच्छ ! सुटसुटीत पण टापटिपीचा. त्यांचे चेहरे पाहा ! किती आनंदी ! किती प्रसन्न ! जणू बालरवीच्या सोनेरी किरणांत उमलून हसणारी फुलेच ! ती सभेत कशी बसली आहेत, पाहा ! त्यांच्या बसण्यात एक विशेष प्रकारची शिस्त तुम्हांला दिसते आहे, नाही ? आणि ही मधून मधून फिरणारी मुले कोण बरे ? त्यांच्या छातीवर हे बिल्ले कसले लटकत आहेत ? त्यावरचा मजकूर वाचलात का ? हं ! कळले ना मग ही कोण मुले आहेत हे ? या बाल-स्वयंसेवकांच्या प्रयत्नानेच मुलांना सभेत योग्य रीतीने बसण्याची शिस्त लागली आहे, बरे का !

आणि या सभेच्या बैठकीची सारी व्यवस्थाही मुलांनीच केली आहे. खाली अंथरलेल्या या सतरंज्या गावच्या पाटलांकडून त्यांनीच मागून आणल्या आहेत. खुर्च्यांची मांडणी, व्यासपीठाची उभारणी त्यांनीच केली आहे. व्यासपीठावरील आणि आजूबाजूची सजावटही त्यांचीच ! या कामाची त्यांना आता इतकी सवय झाली आहे की, कोणताही समारंभ असो, मुले स्वतःच आपआपल्या समित्या स्थापू शकतात. समित्यांची कामे कशी अगदी ठरून गेल्यासारखी झाली आहेत.

त्याप्रमाणे भराभर कामे पार पडू शकतात. अर्थात गुरुजींचे त्यांना मार्गदर्शन असतेच ! पण त्यांच्यातच ‘ मार्गदर्शक ’ही आहेत बरे का !

तो पहा तो बाल-सूत्रधार ! ५ व्या इयत्तेतील आहे तो ! पण कसा ऐटबाज दिसतो आहे पहा ! आत्मविश्वासाच्या पोटी जन्मास आलेली ही ऐट आहे बरे ! आणि त्याचा चेहरा पहा ना ! रसाळपणाची

तकाकी व तेज त्याच्या चेहऱ्यावर विलसत आहे. तो पहा कसा धीटपणाने त्या व्यासपीठावर उभा राहिला आणि सभेतील प्रास्ताविक भाषण करू लागला !

आजच्या या सभेचे अध्यक्ष म्हणजे लोकमान्य टिळक हेच ! सुताचा हार घातलेली त्यांची प्रतिमा खुर्चीवर ठेवली आहे. ती तुम्हांला दिसली ना ? त्यांच्या अध्यक्षतेखालीच ही सभा पार पडणार !

समोर ग्रामस्थ खूपच जमलेले दिसत आहेत. भोवताली गुरुजन व गावातील प्रतिष्ठित लोक बसलेले आहेत. या सर्वांदेखत तो ' चिमुरडा वक्ता ' कसा खणखणीत आवाजात, निर्भयपणे बोलत आहे पाहा ! त्याच्या या प्रास्ताविक भाषणावरून त्याच्या अंगचे पाणी तुम्ही ओळखले असेल ! आता तो ही सारी सभा कशी पार पाडतो, मोहन मंदिरातील मुलेही आपआपली भाषणे कशी पार पाडतात— हे पाहा !

तो पाहा नाव पुकारलेला पहिला मुलगा उठून पुढे आला. त्याने आपल्या भाषणाची सुरुवात कशी पद्धतशीरपणे केली, ऐकलेत ?

' पूज्य लोकमान्यजी, गुरुजन, उपस्थित ग्रामस्थ-बंधू, आणि विद्यार्थी-बंधु-भगिनींनो,' इतकी सुरुवात केल्याशिवाय मुख्य विषयाकडे कोणीच मुलगा वळणार नाही हे तुमच्या लक्षात येईल. आणि मुख्य विषयही पद्धतशीर रीतीने मांडण्याचा आपआपल्या परीने प्रयत्न करील. बोलताना कोणी धांदरटपणा करणार नाही, की घाबरटपणाही दाखविणार नाही. सारे कसे संथपणे, सरावलेल्या वक्त्याप्रमाणेच या बालसभेत बोलतील ! आपणांस ऐकतच राहावे असे वाटेल !

अरे, पण ठण्कन मध्येच ही घंटा कसली वाजली ? त्या चिमुरड्या सूत्रधाराने वाजविली असेल ती घंटा ! प्रत्येक वक्त्यास पाच मिनिटे

वेळ ! वेळ संपण्यापूर्वी एक मिनिट सूचक-घंटा होणारच ! मग बोलणारा कोणीही असो ! वर्गातील मुलगा असो, गुरुजी असोत, की ग्रामस्थांतील कोणी प्रतिष्ठित गृहस्थ असोत ! या नियमास धरूनच पाहा कशी सर्व सभा नियंत्रित होईल ती !

गडबड नाही ! गोंधळ नाही !

आपआपल्या कुवतीप्रमाणे मुलगा किंवा मुलगी आपआपले भाषण करील. विषय मांडण्यात चुकाही होतील; नाही असे नव्हे. कोणाचे भाषण वेळेच्या आधीच संपेल, तर कोणाला वेळेचे भान न राहून ते लांबेलही ! पण सुरुवात व शेवट प्रत्येकजण पद्धतशीरपणानेच करील. सर्वांचा सभाधीटपणा कौतुकास्पदच दिसेल. इतका की, या शाळेत आपणही यावे व सभेत अशा रीतीने बोलावयास शिकावे, असे तुम्हांस वाटेल.

पाहा, मी सांगितले त्याचप्रमाणे सर्व सभा शिस्तीने पार पडली की नाही ? ऐका, शेवटी तो छोटा सूत्रधार काय सांगतो ते ऐका ! तो म्हणतो आहे, ' बालमित्रहो, सभेचे सर्व काम संपले आहे. आता शेवटी राष्ट्रगीत होईल. राष्ट्रगीतासाठी सर्वांनी शान्त उभे राहावे.' ऐकलीत त्याची सूचना. आता तिची अंमलबजावणी कशी होते पाहा ! तुम्ही इतर ठिकाणच्या पुष्कळ सभा पाहिल्या असतील. मोठ्या माणसांच्या सभेतदेखील राष्ट्रगीत सुरू होण्यापूर्वी एकदम शान्तता होत नाही. राष्ट्रगीत सुरू होण्यापूर्वी सर्वांनी नीट उभे रहावे. गडबड, गोंधळ करू नये. आपापसात बोलू नये. राष्ट्रगीत म्हणताना त्यातील अर्थावर आपले लक्ष केन्द्रीभूत झाले पाहिजे. ते गांभीर्यपूर्वकच म्हटले पाहिजे. राष्ट्रगीत म्हणताना आपल्या शरीराची अगदी थोडीदेखील हालचाल होऊ देता कामा नये. राष्ट्रगीत होताच सर्वांनी शिस्तीने

आणि शान्ततेने तेथून निघावे. स्वतंत्र भारताच्या राष्ट्रगीताला मान देणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे !

आणि हेच कर्तव्य, ही मोहन-मंदिरातील बालसेना किती कौतुकास्पद रीतीने पार पाडीत आहे पाहा ! ती पहा मुले—मुली सर्वजण कशी 'हुश्शयार' या स्थितीत उभी राहिली ! लगेच राष्ट्रगीतही सुरू झाले ! किती शान्तता ! मुला-मुलींचा किती गोड आवाज ! आणि किती भावपूर्णतेने ती म्हणत आहेत ! ऐकताना भारताचे हे भावी नागरिक भारताचे वैभव खात्रीनेच वाढवितील असे वाटल्याशिवाय राहात नाही !

राष्ट्रगीत संपले ! पण, ही सर्व मुले पुन: खाली का बरे बसली ? त्या तिकडे पाहा ! गावातील लोक प्रथम निघाले. त्यांची पादत्राणे पाहिलीत का कशी ओळीने लावून ठेवलेली आहेत ती ! दिसतो आहे का येथे काही गोंधळ ? जो तो ओळीने जात आहे, आपापले पादत्राण घालीत आहे आणि आपला पुढचा रस्ता सुधारीत आहे !

गावकऱ्यांतील स्त्रियांचा रस्ता निराळा ! पुरुषांचा निराळा ! हे शिस्तीच्या दृष्टीने सोईचे ! त्यामुळे पाहा पटकन सगळे गावकरी सभास्थानापासून लवकर बाहेर पडू शकले ! त्यानंतर मुली, त्यानंतर मुले.

आणि आता अर्ध्या तासानंतर त्या सभास्थानाकडे पाहा बरे ! याच ठिकाणी सभा झाली होती असे कोणी म्हटले तर खरे तरी वाटेल का ? सर्व जागा झाडून कशी स्वच्छ केली पाहा ! जेथले सामान तेथे ! जेव्हाचे काम तेव्हाच ! ज्याचे सामान आणले होते त्याचे ते लगेच व्यवस्थितपणे परतही गेले ! त्याबरोबरच त्यांचे आभार मानणारी पत्रेही गेली ! त्यात फक्त सामानाचे व सामान देणाराचे

नाव ‘ उत्सव-मंत्र्या ’ने लिहावयाचे, गुरुजींना दाखवावयाचे, आणि सामानाबरोबरच त्या त्या व्यक्तींकडे ती पत्रेही नेऊन द्यावयाची !

मग काय वाटत असेल बरे सामान देणाऱ्या सद्गृहस्थांना ? म्हणून तर ‘ मोहन-मंदिरा ’त सामान पाहिजे असे म्हणताच गावातील कोणीही सद्गृहस्थ कितीही मौल्यवान वस्तू असली तरी ती देण्यास बिल्कुल कचरत नाही. त्यांची खात्री असते की, ‘ हे सामान काळजी-पूर्वक वापरले जाईल आणि काम होताक्षणीच ते चांगल्या स्थितीत परतही मिळेल !

अशी आहे या मोहन-मंदिरातील मुलांना शिकवण ! म्हणूनच ती साऱ्या गावाला आवडतात ! मग तुम्हांलाही ही मुले आवडली ना ? तुम्ही त्यांच्यासारखे वागलात, तर आम्हांला तुम्हीही असेच आवडाल ! त्यांच्यासारखे बनण्याचा कराल ना मग तुम्ही प्रयत्न ?

## ८ : बाल-सेवक

मुलांनो, मागे तुम्ही मोहन-मंदिरास भेट दिली. तेथील मुले सभा कशी पार पाडतात हे पाहिले. त्यांच्या त्या गुणामुळे गावकऱ्यांना ती फारच आवडतात, हेही तुम्हांला कळले.

तुम्हीदेखील सभेत चांगल्या रीतीने बोलू शकाल. तुम्हांला वळण लावले तर तुम्हीदेखील त्यांच्याप्रमाणेच सभा चांगल्या रीतीने पार पाडू

शकाल. पण एवढ्यामुळेच गावकऱ्यांना तुम्ही आवडाल का? की आणखी काही गोष्टी तुम्हांला कराव्या लागतील?

मोहन-मंदिरातील मुले गावकऱ्यांसाठी आणखी काय गोष्टी करतात? हा प्रश्न तुम्ही विचाराल! त्याचेच उत्तर मी आता तुम्हांला देणार आहे.

मागेच मी तुम्हांला सांगितले की, गावकऱ्यांना मोहन-मंदिर फार आवडते. पुष्कळ वेळा ते मोहन-मंदिरात जातात, आणि त्यांनी आपल्या मंदिरात यावे म्हणून गुरुजी मुद्दाम मुलांचे कार्यक्रम आखतात. महिन्यातून एक दिवस मुलांचा करमणुकीचा कार्यक्रम असतो. गावकऱ्यांसाठीच असतो. त्यासाठी गावात दवंडी पिटवून सर्वांना जाहीर आमंत्रण दिले जाते. बसण्याची सोय चांगली करतात. अर्थात त्यासाठी होणारा सर्व खर्च गावकरीच सोसतात! कारण हा कार्यक्रम चांगला २—२॥ तासांचा असतो. गाणी, गोष्टी, नकला, पोवाडे, संवाद, छोटी छोटी नाटके, इत्यादी भरगच्च कार्यक्रम असतो. लोकांना हा एक ‘ सिनेमा ’ वाटतो आणि तोही मोफतच पाहावयास मिळतो. मग झाडून सारी लहानमोठी माणसे या कार्यक्रमात आली तर काय नवल ?

या करमणुकीच्या कार्यक्रमाप्रमाणेच दर सहामाहीस खेळांच्या चढाओढी व सामने आखतात! त्यासाठी आजूबाजूच्या शाळांतील मुलेही येतात! गावकऱ्यांनाही मुद्दाम बोलावले जाते. मोठ्या माणसांचेही काही सामने असतात! त्या वेळी मोठ्या माणसांचे मुलांसाठी करमणुकीचे कार्यक्रम असतात. या कार्यक्रमांत पायचेंडू, हातचेंडू यांचेही सामने होतात! मोठ्या माणसांना हे शिक्षण देण्यासाठी मोहन-मंदिरातील भीमराव गुरुजी सदैव तयारच असतात!

स्त्रियाही स्वतंत्रपणे संक्रान्तीतील आपले खेळ आखतात! हळदी-कुंकवाच्या समारंभाच्या जोडीला करमणुकीचे कार्यक्रमही होतात!

गमतीचे खेळ होतात ! त्यांची करमणूक मुली करतात. त्याही मुलां-मुलींची करमणूक करतात. शाळेतील मुले, मुली आणि गावातील स्त्री-पुरुष अशा प्रसंगी एकत्र जमले म्हणजे वाटते की, ही सारी माणसे मोठ्या अशा एका कुटुंबातीलच आहेत ! !

हे झाले नुसत्या करमणुकीच्या कार्यक्रमांबाबत ! मोहन-मंदिरातील मुले गावकऱ्यांच्या उपयोगी पडण्यासाठी नेहमीच तयार असतात. तुम्ही म्हणाल, एवढीशी छोटी तर मुले ! ती गावकऱ्यांच्या उपयोगी काय पडणार ? पण या बाबतीत तुम्हांला आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही ! कारण गावकऱ्यांच्या रोजच्या जीवनात असे अनेक प्रसंग येतात की, त्या वेळी ही बालसेवकांची सेना त्यांच्या चांगलीच उपयोगी पडू शकते.

साधी आठवड्याच्या बाजाराचीच गोष्ट घ्या ना. आजूबाजूच्या गावचे स्त्री-पुरुष डोक्यावर भाजीपाला घेऊन त्या दिवशी विकावयास म्हणून येतात. एकदा माल विक्रीस मांडला म्हणजे तो संपेपर्यंत तेथून उठण्याची सोय नसते. हाताखाली दुसरे कोणी असतेच असे नाही. अशा वेळी तहान लागली तरी मुकाट्याने तसेच काम करणे भाग पडते. बाजारकऱ्यांची ही अडचण आमच्या बालसेवकांनी ओळखली आणि त्यांच्या ‘ सेवापथका ’मार्फत त्यांनी एक काम आपल्या अंगावर घेतले. माल विकणाऱ्या मंडळींना त्यांच्या जागेवर जाऊन पिण्याचे पाणी वाढावयाचे ! हे काम मुलांनी हाती घेताच बाजारातील या सर्व मंडळींना काय वाटले असेल बरे ? त्यांनी या मुलांना दुवा द्यावा हे उघडच आहे !

पण हे झाले नैमित्तिक काम ! याशिवाय रात्री मोहन-मंदिरात पोथीवाचन, वर्तमानपत्राचे वाचन इ. गोष्टी वरच्या वर्गातील मुलेच

करतात ! ५ ते ७ इयत्तांतील मुले आळीपाळीने ही सर्वच कामे वाटून घेतात ! त्यांचे सर्व जीवन 'मंत्रिमंडळा'मार्फतच चाललेले असते ! त्यामुळे सर्वांना काम करण्याची संधी मिळते ! कोणा एकट्या-दुकट्यावर अधिक बोजा पडत नाही ! स्वाभाविकच, काम करण्यातील उत्साह व कायम हौस राहते.

रात्रीच्या वाचनात शेतकऱ्यांना उपयोगी पडेल अशीही माहिती असते. मंदिराची एक एक भिंत रंग देऊन गुळगुळीत केली आहे. तिचा फळ्यासारखा उपयोग होतो. त्या फळ्यावर आपला शेतकरी व परदेशी शेतकरी यांची तुलनात्मक माहिती लिहिली जाते. इतर देशांत एकरी उत्पन्न वाढविण्याचे काय प्रयत्न चालू आहेत ? आपली शेती मागासलेली का ? आपले सरकार शेती सुधारण्यासाठी किंवा खेड्याचे जीवन विकसित करण्यासाठी कोणते उपाय योजीत आहे ? निरनिराळे शास्त्रीय शोध कोणी लावले ? त्यांचा आपल्या रोजच्या जीवनात कसा उपयोग होतो ? आपल्या भारतात शास्त्रीय शोधांचा उपयोग करून खेड्याचे जीवन कसे सुधारता येईल ?— इत्यादीसंबंधीची अतिशय उपयुक्त माहिती फळ्यावर लिहून ठेवली जाते, वाचून दाखविली जाते. त्या वेळी गुरुजी स्वतः हजर असतात. ते वाचलेल्या भागाचे स्पष्टी-करण करतात. तेही गावकऱ्यांना अनेक मनोरंजक गोष्टी सांगतात. आरोग्याच्या गोष्टी, आहाराच्या गोष्टी, आजाराच्या गोष्टी अनेक छोट्याछोट्या गोष्टी ऐकावयास मिळतात ! दिवसभराच्या कष्टाचा शीण नाहीसा होतो. रोज अर्धा तासच पण त्यांना कसा अगदी मजेचा वाटतो. लोक मोहन-मंदिरात स्वतःहून जमतात !

याशिवाय अधूनमधून ग्रामसफाई करणे, कंपोस्ट खताचे खड्डे खणणे, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे, आरोग्यसप्ताह साजरे करणे इत्यादी गोष्टी चालूच असतात. या कार्यक्रमांत मुलांबरोबर गावकरीही

मोठ्या आस्थेने व उत्साहाने भाग घेतात हे विशेष ! सर्वांना मुलांबद्दल, शिक्षणाबद्दल जिज्ञासा वाटते. पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून किती तरी चांगली माहिती येते, ती आपणांस वाचता आली असती तर ! असे विचार पुष्कळांनी बोलून दाखविले ! त्यामुळे गुरुजींनी लगेच प्रौढ शिक्षणाचे समाजशिक्षणाचे वर्ग काढले ! या कामातही मुले पुढे आहेतच ! या गावात घरोघरी वर्ग सुरू आहेत. दोन दोन मुलांमागे एक एक घर वाटूनच दिले आहे. ठरलेल्या वेळी ठरलेली मुले आपआपल्या कामासाठी जाणारच ! कधी त्यांच्याबरोबर भजन म्हणतील, कधी त्यांना गोष्टी सांगतील ! तर कधी प्रत्यक्ष लेखन-वाचन शिकवतील ! अशा रीतीने गावकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे कार्यही मुले करीत असतात ! बालपणापासून त्यांना समाजसेवेचे एवढे बाळकडू मिळाले आहे !

एकदा तर एका ग्रामस्थावर मोठाच बाका प्रसंग गुदरला होता ! त्याच्या शेतातील कडब्याच्या गंजीला आग लागली ! शेतापासून विहीर तर दूर ! शेतकरी तर बिचारा एकटाच ! काय करणार तो ? इतक्यात मोहन-मंदिरातील इषाऱ्याची घंटा वाजली ! सारी मुले भर्रकन शाळेत जमली ! स्वयंसेवकाच्या पोपाखात जमली. प्रत्येकाला घरातून छोटेसे भांडे, कळशी, बादली जे मिळेल ते आणण्यास सांगण्यात आले ! आणि त्या साधनांसह ही वानरसेना गंजीकडे धावली. ही १०० मुले आणि गावकरी— मग काय ! आगीवर पाण्याचा वर्षाव झाला ! आणि एका तासाच्या आत आग विझून गेली !

या वेळी त्या ग्रामस्थाला काय वाटले असेल बरे ? तो म्हणाला, ‘ मोहन-मंदिरातील मुलांनी मला वाचविले ! आग भडकली असती तर माझे घर पेटून जळून खाक व्हायला वेळ लागला नसता ! धन्य आहे त्या बाळांची ! त्यांच्या रूपाने जणू देवच माझ्या मदतीस धावून आला! ’

असे प्रसंग उद्भवले की गावकऱ्यांना मोहन-मंदिरातील मुलांची आठवण येते. गावकऱ्यांनादेखील संकटकाली या बालसेवकांचा मोठा आधार वाटतो. संकटच्या वेळी लहान मुलांना मोठ्या माणसांचा आधार वाटतो हे तुम्ही ऐकले असेल; पण संकटकाली मोठ्या माणसांना लहान मुलांचा मोठा आधार वाटतो, हे नवलच आहे, नाही? पण हे नवल मोहन-मंदिरातील मुलांच्या बाबतीत घडते खरे! स्वाभाविकच, सर्व गावकऱ्यांना ही मुले आपल्या पोटच्या मुलांप्रमाणे वाटावीत यात काय बरे आश्चर्य!

## ९ : खरी परीक्षा

आगगाडी भरधाव वेगात चालली होती. शामचे वडील भाऊसाहेब मोरे गाडीतून प्रवास करीत होते. त्यांच्या हातात एक पत्र होते. ते ते पुन: पुन: वाचीत आणि ' हे असे झाले तरी कसे?' असा प्रश्न स्वत:शीच पुटपुटत. ' शामचा नंबर खाली गेला तरी कसा! चांगला हुशार मुलगा. गणितात शंभरपैकी शंभर गुण पटकावणारा, इतिहासातील सर्व घटना तोंडपाठ, भूगोल-शास्त्रादी विषयांतही गती चांगली. लेखन शुद्ध, अक्षरही वळणदार! असे असून वार्षिक परीक्षेत त्याचा आठवा नंबर यावा हे आश्चर्यच आहे. मलादेखील आश्चर्य वाटते आहे. मग पोराने मनाला वाईट वाटून घ्यावे यात काय नवल? बरे तो परीक्षेच्या वेळी आजारी होता म्हणावे तर शंकररावांनी तसे काहीच

लिहिले नाही. उगीच मित्रांच्या नादी लागलो आणि पोराला या मोहन-मंदिरात ठेवले. म्हटले १-२ वर्षांचाच काळ आहे ! पुन: बदली झाली तर बदलता येईल गाव ! तशात शंकररावांनी मोहन-मंदिराची खूपच स्तुती केलेली !....पण मग हे असे झाले कसे ! पाहू या आता समक्षच काय काय दिसते ते !'

....इत्यादी विचारांची साखळी घोळत होती, तोच स्टेशन आले आणि भाऊसाहेब शंकररावांच्या घरी येऊन पोहोचलेही ! शाम त्या वेळी नुकताच शाळेत गेला होता. शंकररावांनी भाऊसाहेबांचे यथोचित स्वागत केले. स्नान, जेवण आटोपून गप्पागोष्टी करीत ते लगेच मोहन-मंदिराकडे निघाले.

' काय हो शंकरराव ? ही काय भानगड आहे,– ती कळू द्या तरी एकदा ! आमच्या शामपेक्षाही हुशार मुले या शाळेत आहेत म्हणायची तर ! की काय भानगड आहे ? तुम्ही त्याच्या गुरुजींच्याजवळ तरी चौकशी केलीत का ?' भाऊसाहेबांना भराभर प्रश्न विचारले.

' अहो भाऊसाहेब,' शंकरराव बोलू लागले, ' मी सर्व चौकशी केली आहे. गुरुजींनी सर्व माहिती मला चांगल्या रीतीने दिली आहे. याबाबत गुरुजींनी मला आगाऊ सूचनाही दिली होती. मीही शामला इषारा दिला होता. पण त्या बेट्याने माझे वा गुरुजींचे कोणाचेच ऐकले नाही ! बरे, तुम्हांलाही कळवून काय उपयोग होता ? तुम्ही आपल्या कामाच्या गर्दीत ! म्हटले येऊ द्या त्याला अनुभव ! पडेल थोडा महागात, पण त्याशिवाय त्याला खरा शहाणपणा यायचा नाही ! अखेरीस व्हायचे तेच झाले आणि आता बसला आहे तोंड चिमणीएवढे करून ! बरे हे तुम्हांला पत्राने काय कळविणार ? आता तुम्हांला कामातून सवड होती असे कळले, म्हणून मुद्दामच तुम्हांला बोलावून घेतले ! एक-दोन दिवस नाही तरी तुम्ही माझ्याकडे राहणार कसे ?

म्हणून काढली झाले ही युक्ती ! आता मी सगळे सांगेनच तुम्हांला– पण आता आपण निघालोच आहोत. तेव्हा गुरुजींच्याच मुखाने सगळ्या गोष्टी ऐकू, झाले !

इतक्यात मोहन-मंदिरही आले ! शामचे वडील व शंकरराव मोहन-मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत शिरले. का कोणास ठाऊक पण भाऊसाहेबांच्या मनावर शाळेच्या वातावरणाचा चांगलाच परिणाम झाला. अवती-भोवतीची स्वच्छता व टापटीप पाहून त्यांना एकदम प्रसन्न वाटले. इमारत साधी पण आकर्षक वाटली. वर्गातील मुले तरतरीत व चुणचुणीत दिसली. त्या सर्वांच्या चेहऱ्यावर एक विशेष प्रकारचे तेज विलसताना दिसले. तेथील वातावरणात काही तरी नावीन्य आहे; पाहुण्यांना मोहून घेणारी काहीं तरी विशेष जादू आहे, अशी त्यांची खात्री पटली.

इतक्यात एक छोटासा मुलगा त्यांना सामोरा आला. त्याने त्यांना सस्मित चेहऱ्याने अभिवादन केले. ‘ आपणास कोण पाहिजे ?’ म्हणून त्याने त्यांना नम्रपणे पण गोड वाणीने विचारले. त्या लहान मुलाचा तो धीटपणा व पाहुण्यांशी वागण्याची ती एकंदरीत ढब पाहून भाऊ-साहेब चकितच झाले. तो मुलगा तर शामपेक्षाही लहान दिसत होता. आणि त्याने पुढे होऊन हा प्रश्न का विचारावा ? शाळेला शिपाई नाहीत काय ? मुख्य गुरुजी आज शाळेत नाहीत काय ? असे प्रश्न त्यांच्या मनात उभे राहिले. म्हणून त्यांनी त्या मुलाला उत्तर देण्याच्या ऐवजी उलट प्रश्नच विचारले—

‘ बाळ, तू रे कोण ! तू काय म्हणून माझी चौकशी करतोस ? तुझ्या शाळेला शिपाई नाहीत काय ? तुझे मुख्य गुरुजी कोठे आहेत ?’

त्यांचे प्रश्न ऐकून तो छोटासा मुलगा धीटपणे बोलू लागला. ‘ मी येथील इयत्ता ६ वीतील विद्यार्थी आहे. मी चालू महिन्याचा प्रधानमंत्री

आहे. कोणी पाहुणे मोहन-मंदिरात येताना दिसले की त्यांचे स्वागत प्रधानमंत्र्याने करायचे असते. त्यांना मुख्य गुरुजींच्या खोलीत नेऊन दोघांची गाठ घालून द्यायची, हे प्रधानमंत्र्याचे काम असते.' असे म्हणून तो छोटा प्रधानमंत्री चालू लागला. चालताना तो म्हणाला, 'ती पाहा आमच्या गुरुजींची खोली. आपण दोघेही तिकडे चला.'

त्याच्या त्या बोलण्याचा भाऊसाहेबांच्या मनावर इतका सुपरिणाम झाला की, त्यांचे पाय आपोआपच त्या बाल-प्रधानमंत्र्याच्या मागोमाग चालू लागले!

मुख्य गुरुजी खोलीसमोर उभे होतेच! त्यांनी भाऊसाहेब व शंकरराव यांचे स्वागत केले. त्यांना आत नेऊन आसनावर बसविले व विचारपूस करण्यास सुरुवात केली.

गुरुजींचा पोशाख अगदी साधा होता. शुद्ध खादीचा. पांढरा स्वच्छ! चेहेरा प्रसन्न! वृत्ती प्रेमळ! आणि बोलणे लाघवी. आपल्या-समोरील माणसावर एक प्रकारची छाप पाडण्याची लकब! त्यामुळे भाऊसाहेबांचे एकंदरीत शाळेबद्दलचे कुतूहल चांगलेच वाढले! कोणत्या का निमित्ताने होईना पण आपण येथे आलो हे चांगलेच झाले, असे त्यांना एकदम वाटू लागले!

थोड्याच वेळात त्यांनी गुरुजींजवळ मुख्य विषय काढला. 'शामराव मोरे नावाचा मुलगा यंदाच आपल्या शाळेत इ. ६ वी मध्ये आला आहे ना, तो माझा मुलगा! तो म्हणे वार्षिक परीक्षेत ८ वा आला. वास्तविक तो पहिल्या नंबराने पास व्हायचा! पण हे असे झाले कसे? याबद्दल मलाही आश्चर्य वाटते आहे. त्याला तर किती वाईट वाटत असेल याची कल्पनाच करणे बरे! अहो तो धड जेवणही घेईनासा झाला आहे. माझ्या या मित्रांनी कळविले म्हणून मी आलो! नाही तरी मला आपली

शाळा एकदा पाहायची होतीच ! खूप प्रसिद्धी ऐकली आहे मी आपल्या शाळेची ! तेव्हा म्हटले बरा आहे हा प्रसंग, आता जाऊन यावे झाले. तेव्हा हा काय प्रकार आहे हे प्रथम कळेल तर बरे होईल ! ' भाऊसाहेब भराभर बोलतच सुटले !

त्यांचे बोलणे संपल्यासारखे वाटताच, गुरुजी म्हणाले, ' आपण समक्ष इथे आलांत ही फार आनंदाची गोष्ट आहे. आपणांस हवी ती सर्व माहिती मी व्यवस्थितपणे पुरवीन. प्रथम आपण सर्व मंदिर पाहू, मग बाकीच्या गोष्टी निवान्तपणे बोलू.

असे म्हणून गुरुजींनी भाऊसाहेब आणि शंकरराव यांना सर्व मोहन-मंदिर दाखविले. मंदिरात चाललेल्या एकंदर कामाची त्यांना परिपूर्ण कल्पना दिली. भाऊसाहेबांना तेथील कामाची सर्वच पद्धत कुतूहलजनक वाटली. मूलोद्योगाचे पद्धतशीरपणाने चाललेले काम, त्यासंबंधीचे व्यवस्थितपणे भिंतीवर लावलेले तक्ते व आलेख, सामानाची टापटीप व नीटनेटकेपणा, वर्गातील मंत्रिमंडळाचे तक्ते व त्यांची कामे; वर्षभर मुलांनी साजरे केलेले सण, उत्सव, समारंभ यांबद्दलची नोंद, झालेल्या बालसभा व त्यांत बोलणाऱ्या वक्त्यांची नोंद; मंदिरात झालेल्या करमणुकीच्या कार्यक्रमांची नोंद, कोणी काय करमणूक केली ? ग्रामस्थांची संख्या किती प्रमाणात कार्यक्रमास हजर होती याबद्दलची नोंद; बालसेवकांचे स्वयंस्फूर्त सेवापथक व त्यांनी केलेली सेवा; रोजच्या परिपाठाची नोंद; प्रार्थना, सुविचारांची नोंद, इत्यादी सर्व गोष्टी भाऊसाहेबांनी काळजीपूर्वक पाहिल्या. त्यांना अतिशय आनंद झाला. वास्तविक आता सुटी होऊन शाळेचे काम विस्कळितपणे नाममात्रच चालावयास हवे होते ! पण गुरुजींनी त्यांना सांगितले की, ' आम्ही परीक्षेनंतर फक्त एकच दिवस सुट्टी घेतो. त्यानंतर आमची कामे अगदी नियमितपणे— नव्या जोमाने सुरू राहतात ! ' हे ऐकून तर भाऊसाहेबांना

शिक्षकांबद्दल व मुलांबद्दलही धन्यता वाटू लागली. खरोखरीच येथे ध्येयवादी, कर्तव्यतत्पर असेच शिक्षक काम करीत आहेत.

' आपण राष्ट्राचे एक मोठे कार्य करीत आहोत.' ही दृढ श्रद्धा, हा ठाम विश्वास त्यांच्या ठिकाणी आहे. आणि कार्यात आत्मा ओतून जिवंतपणे, तळमळीने काम चालू आहे, अशी त्यांची पुरेपूर खात्री झाली. शिक्षकांच्याबद्दलचा आदर त्यांच्या मनात दुणावला. त्यांनी केलेल्या या कार्यामुळे त्यांचे अंतःकरण आत्यंतिक आदराने भारावून गेले व त्या स्थितीतच ते गुरुजींच्या खोलीत येऊन पोहोचले !

' भाऊसाहेब, पाहिलेत आमच्या मोहन-मंदिराचे कामकाज ! ' आता गुरुजींनी मुख्य मुद्द्याच्या दृष्टीने बोलावयास सुरुवात केली. ' आता वर्षभर मुलांनी केलेल्या या विविध कामांची नोंद कशी ठेवलेली आहे हे पहा ! ' असे म्हणून त्यांनी इयत्ता ६ वीच्या मुलांचे ' गुण-दर्शकपत्रक ' दाखविले. भाऊसाहेबांनी ते कुतूहलपूर्वक पाहिले. त्यात शामचेही नाव होतेच ! सफाई, मूलोद्योग, करमणुकीचे कार्यक्रम, सेवापथकाचे काम, वर्गमंत्र्याचे काम इ. बाबतींत शामला फारच कमी गुण होते. गणित, इतिहास, भूगोलादी विषयांत मात्र त्याला पहिल्या नंबरचे गुण होते. ते नोंदपत्रक पाहून शामच्या वडिलांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. शामचा नंबर खाली का गेला याबद्दलचे कोडे त्यांना लगेच उलगडले !

' वार्षिक परीक्षेतही आम्ही मुलांच्या या विविध गुणांचे मार्कही लक्षात घेतो.' गुरुजी म्हणाले, ' केवळ बौद्धिक प्रगती आम्ही पाहात नाही. तुमच्या शामला मी या बाबतीत पुष्कळ वेळा समजावून सांगितले; पण सफाईचे काम, मूलोद्योगाचे काम, सेवापथकाचे काम करण्यात त्याने कुचराई केली. मुलांच्या कौशल्यापेक्षाही त्यांच्या काम करण्याच्या

प्रामाणिक प्रयत्नांना आम्ही अधिक महत्त्व देतो. अर्थात त्याचे आत्ता-पर्यंतचे वळण निराळे होते. ४—५ वर्षे निराळ्या वातावरणात गेल्या-मुळे त्याला येथील वातावरणात अवघडल्यासारखे वाटावे हे स्वाभाविकच होते. पहिल्या सवयी त्याला एकदम सोडवल्या नाहीत. पुढल्या वर्षी त्याच्यात खात्रीने फरक पडेल ! काय, तुम्हांला काय वाटते ? '

' खरे आहे तुमचे म्हणणे ! ' भाऊसाहेब म्हणाले.

' अहो, आजच्या मुलांना हेच तर खरे शिक्षण मिळाले पाहिजे.' मध्येच शंकरराव म्हणाले, ' आमची मुले आता स्वावलंबी झाली पाहिजेत. कष्टाची कामे करताना कसलाही संकोच त्यांना वाटता कामा नये. वर्णभेद, जातिभेद, यांचा नाश करायचा असेल तर सर्वांनी शारीरिक श्रम करावयास शिकले पाहिजे.'

' आपले सर्व शिक्षण याच पद्धतीने दिले गेले पाहिजे.' भाऊसाहेब म्हणाले, ' तरच स्वतंत्र भारताची भावी पिढी आपल्यापेक्षा काही तरी निराळी जन्मेल आणि आपल्या भारताचे भाग्य शुक्लेन्दुवत् वाढेल ! '

' अशा प्रकारचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवूनच आम्ही आपल्या कुवती-प्रमाणे इथे काम करीत आहोत ! ' गुरुजी मध्येच नम्रपणे बोलले.

' गुरुजी, खरोखरीच धन्य आहे तुमची ! ' भाऊसाहेब उद्गारले, ' मोहन-मंदिराची कीर्ती आज सर्व महाराष्ट्र राज्यात का पसरत चालली आहे याचे कोडे उलगडले. या ठिकाणचे मुलांचे व शिक्षकाचे जीवन मला खरोखरीच आदर्श असेच वाटले. विशिष्ट जीवनातून तुम्ही मुलांना नेत आहांत, ही खरोखरच चांगली गोष्ट आहे. आणि त्यांच्या जीवनाचे बारकाईने निरीक्षण करून त्यांची परीक्षा घेण्याची तुमची पद्धतदेखील आदर्शच आहे. सर्व शिक्षणक्षेत्रात ती

अनुकरणीय अशीच आहे. अहो, हीच परीक्षा होय ! अशा प्रकारची शिक्षण घेणारी मोहन-मंदिरे ठिकठिकाणी स्थापन होतील तर आमच्या मुलांच्या भावी आयुष्यावर त्याचा केवढा सुपरिणाम होईल ! ! माझा शाम आता पुढील वर्षी इथेच राहील ! '

' आमच्या येथील जीवनाचा त्याच्यावर खात्रीने चांगलाच परिणाम होईल. त्याच्यात आतापेक्षा खूपच बदल होईल.' गुरुजी म्हणाले.

' तुमच्यासारख्या ध्येयवादी गुरुजींच्या देखरेखीखाली वाढणाऱ्या मुलांच्या भविष्याबद्दल मला आता कसलीच चिंता नाही !' भाऊसाहेब उद्गारले. त्यां उभयतांनी मुख्य गुरुजींना आदरपूर्वक प्रणाम केला आणि ते आपापल्या निवासस्थानी परतले.

ग्रंथसंग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
...... वि ..............
...................नोंद दि..............

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. 92203 नों दि
वि. ...........

IRBK-0112273

# कुमारांची आवडती पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| ★ | जिंकणाऱ्यांचे जग | शं. ग. चाफेकर | ३-०० |
| ★ | महाराष्ट्राचे सुपुत्र, भाग १ ला | य. गो. नित्सुरे | १-१२ |
| ★ | प्राचीन पुरुषोत्तम | गो. नी. दांडेकर | २-५० |
| ★ | सराई ( संक्षिप्त ) | र. वा. दिघे | २-०० |
| ★ | गाळीव रत्ने | चिं. वि. जोशी | २-०० |
| ★ | गजाभाऊ, भाग १ ला | रामतनय | २-५० |
| ★ | दाणे आणि खडे | श्री. वा. काळे | २-५० |
| ★ | महात्मा गांधी | ना. सी. फडके | १-५० |
| ★ | शिंपल्या | सौ. सुमति पायगावकर | २-५० |
| ★ | शेवंती | सौ. शान्ता हसबनीस | १-०० |
| ★ | अक्षयपात्र | यदुनाथ थत्ते | २-०० |
| ★ | कुमारांचा नवा सोबती | य. गो. नित्सुरे | ३-०० |
| ★ | कमलफुले | साने गुरुजी | २-०० |

♣ ♣ ♣

## व्हीनस प्रकाशन

*'तपश्चर्या'*

३८१ क, शनिवार पेठ : पुणे २